

मे ) मूल्य ६० पैसे ( १९७८

श्रीसाई बाबांच्या जागतिक मंदिरातील

# मूर्तींच्या छायाचित्रांचे अपूर्व प्रदर्शन

**मंदिर चालकांना आग्रहाची विनंती**

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्याने शिरडी येथे अगदी नजिकच्या काळात एक अपूर्व प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

श्रीसाईबाबांची भारतात ठिकठिकाणी नव्हे तर जगातही मंदिरे आहेत. या मंदिरातून कुशल शिल्पकारांनी बाबांच्या विविध प्रकारे घडविलेल्या नयनरम्य अशा मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. अनेक चित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून बाबांच्या रेखीव सुंदर प्रतिमा चितारलेल्या आहेत. अशा या मूर्तींच्या व चित्रांच्या छायाचित्रांचे अपूर्व असे प्रदर्शन भरविण्याचे संस्थानने योजिले असून साईभक्तांना हे अभूतपूर्व प्रदर्शन पहाण्याची एक दुर्मिळ संधि लाभणार आहे.

श्रीसाईबाबांच्या जगातील ठिकठिकाणच्या मंदिर चालकांनी आपल्या मंदिरातील बाबांच्या मूर्तीची किंवा प्रतिमांची छायाचित्रे या प्रदर्शनासाठी पाठवून संस्थानला संपूर्ण प्रकारे सहकार्य करावयाचे आहे. या प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात आलेली नाही. मंदिर चालकांनी आपापल्या मंदिरातील मूर्तीचे किंवा प्रतिमेचे छायाचित्र २५ सेंटीमीटर लांब ( १० इंच ) व २० सेंटीमीटर रुंद ( ८ इंच ) या मोजमापात शक्य तर पिवळसर किंवा क्रीम रंगाच्या माऊंटवर चांगले चिकटवून पाठवायचे आहे. मंदिरात बाबांच्या एकाहून अधिक मूर्ती किंवा प्रतिमा असतील तर त्यांची सुद्धा याच मोजमापात छायाचित्रे माऊंटवर बसवून पाठवावीत. काचेच्या फ्रेमस् अजिबात पाठवू नयेत. सर्व चित्रांच्या मागे, चित्रातील मूर्ती कोणत्या मंदिरातील आहे, ती किती फूट उंचीची आहे, तिचा शिल्पकार कोण, चित्रकार कोण, केव्हा स्थापन केली याचा निर्देश असावा.

सर्व छायाचित्रे उशिरात उशिरा **१५ ऑक्टोबर १९७८** पर्यंत श्री. संपादक श्रीसाईलीला, 'साई निकेतन', ८०४ बी, खोदादाद सर्कल, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर व्यवस्थित पाठवावीत.

जगा लावावें सत्पथीं । हेंचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

अविद्योपाधि आत्मा 'जीव' ।
मायोपाधि आत्मा 'शिव' ।
जाणे घालवूं हा भेदभाव ।
समर्थ गुरुराव एकला ॥ १८४ ॥

मन संकल्प विकल्पाधीन ।
करा साईपायीं समर्पण ।
मग तेथून पावे जें स्फुरण ।
त्याचें अहंपण त्याजवळ ॥ १८५ ॥

तैसीच सकल क्रियाशक्ती ।
ती ही समर्पा साईप्रती ।
मग तो आज्ञापी जैसीया रीतीं ।
तैसीये स्थितीं वर्तावें ॥ १८६ ॥

जाणा सकल साईची सत्ता ।
भार घालोनी तयांवरता ।
कार्य करितां निरभिमानता ।
सिद्धी ये हाता अविकळा ॥१८७॥

परी म्हणाल मी हें करीन ।
धराल अल्पल्पही अभिमान ।
फळ येईल तात्काळ दिसोन ।
विलंब क्षणही न लागेल ॥ १८८ ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] मे १९७८ [ अं. २

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका—मे १९७८


| | |
|---|---|
| १) संपादकीय — | संत स्वरुपाची ओळख |
| २) डॉ. गजानराव दाभोळकर–३९ | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३) युगावतार श्रीसाईबाबा–१३ | श्री. चंदकांत सामंत |
| ४) श्रीअवधूत स्वामीमहाराज | श्री. सुभाष पाटील |
| ५) साईनामी दंगलो | श्री. व्ही. एस आकेरकर |
| ६) श्रीसाईच्या धाव्याने तारले | सौ. श्री. पांडुरंग शहाणे |
| ७) जाणा येथे आहे ...... | श्री. चंद्रकांत सामंत |
| ८) वैद्यराज बाबासाई धावूनिया मजकडे येई | कु. रक्षा वागळे |
| ९) वाऱ्यावरचे विचार | श्री. द. शं. टिपणीस |
| १०) राष्ट्रपतींची शिरडी भेट | |
| ११) श्रीसाईलीला लेखक कवींचे चौथे स्नेहसंमेलन | |
| १२) शिरडी वृत्त माहे फेब्रुवारी ७८ | |
| १३) शिरडीवृत्त माहे मार्च ७८ | |
| १४) आणि श्री साई कविता | |

# संपादकीय—

स. न. वि. वि.

## संत स्वरूपाची ओळख सर्वांनाच का होत नाही ?

**य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥**

श्रीद्वारकाधीशाचे प्रत्यक्ष मुखातून भगवत् गीतेत त्यांच्या पराभक्तीची जी बरीच वर्णने ठिकठिकाणी आली आहेत त्यात वरील श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे. या श्लोकाची भूमिका फार खोल आहे. प्रत्यक्ष सद्‌गुरूंना उद्देशून हा श्लोक आहे. संत हे परमेश्वराची पराभक्ती कशा रीतीने करतात हे या श्लोकात दर्शविलेले आहे. सद्‌गुरूची व्याख्या करताना शास्त्रकारांनी दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. एक त्यांचे श्रोत्रियत्व व दुसरे त्यांचे ब्रह्मनिष्ठत्व. श्रोत्रिय म्हणजे विषय स्पष्टपणे समजावून देण्याची कला. ‘ जो शब्दज्ञाने पारंगतु आत्मानुभवे डुल्लतु ’ यातही हेच स्पष्ट केले आहे. जो विषय किंवा जे तत्व ते समजावून देतात त्याविषयी शब्दज्ञानाबरोबर प्रत्यक्ष अनुभव करून देणे हा अधिकार संतांचा असतो. बोलाचीच कढी, बोलाचाची भात । जेवूनियां तृप्त, कोण झाला ॥ असा शब्दपांडित्याचा बाजार तेथे नसतो.

## सद्‌गुरुमहिमा मोठा आहे

सद्‌गुरुमहिमा फार मोठा आहे. तो इतका की, त्याचे वर्णन प्रत्यक्ष भगवंतांनी फार ठिकाणी केलेले आहे. भगवंताला त्याचे भक्त इतके प्रिय असतात की, त्यांच्याकरिता परमेश्वराने काय केले नाही ? हाच प्रश्न उलट विचारावा लागेल. भक्तांचे पदरज आपल्या मस्तकावर पडावे म्हणून परमेश्वर भक्तामागे धावतो. आपल्या हातात धरलेले कमळ देवाने केवळ भक्त भेटताक्षणीच त्याची पूजा करिता यावी म्हणूनच धरलेले आहे. अशी काव्यमय वर्णने ज्ञानेश्वरीत बरीच आलेली आहेत. यातला मतितार्थ आमच्या लक्षात येत नाही. भक्त मोठे की भगवंत मोठे याचा वाचकांना गोंधळ पडतो. भक्तांची भूमिका स्पष्ट होण्याकरिता श्रीज्ञानेश्वरांनी निरनिराळ्या उपमा देऊन भक्तमहात्म्य अपूर्वतेने वर्णिले आहे.

वरील श्लोकात आपल्या भक्तांची पराभक्तीची रीति सांगितली आहे. ‘ हे माझे परम गुह्य ज्ञान जो माझे विषयी अज्ञान असणाऱ्यांना सांगून सज्ञान करील त्यानेच माझी सर्वश्रेष्ठ भक्ती केली आहे व तोच ही भक्ती करून माझ्या स्वरूपाला येऊन मिळेल हे निःसंशय समज. ’

## संतांचा अधिकार

वरील श्लोकाप्रमाणे पाहू गेल्यास हा अधिकार फक्त संतांचाच आहे. 'जे जे आपणासि ठावे। ते ते दुसऱ्याशी शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन' ही समर्थोक्तिही हेच सूचित करते.

संत आपल्या अधिकारी शिष्याला 'आपणासारखे करिती तात्काळ। नाहीं काळवेळ तयांलागी।' कोणत्याही गोष्टीला अधिकार हा लागतोच. खडकावर बीजारोपण निष्फळ असते. संतकृपा होण्यास आपण योग्य अधिकारी बनणे ही फार महत्वाची जबाबदारी आपणावर आहे.

ब्रह्मानुभव देण्याची संतांची रीति शास्त्रकाराने काही ठिकाणी वर्णिली आहे. दर्शनात्, स्पर्शनात्, शब्दात, कृपया इत्यादि प्रकारानी महात्मे आपला आत्मानुभव सत् शिष्याला देतात. केवळ कृपादृष्टीने सद्‌गुरूने शक्तिपात करून आत्मानुभवी झालेल्यांची उदाहरणे पुष्कळ आहेत. वरद्हस्त मस्तकी ठेवून किंवा उपदेश करून, किंवा मनोमय कृपा करून अनुभव देणारे महात्मे आपणाकडे बरेच झालेले आहेत.

श्रीबाबा हे अशाच महान अधिकारी विभूतींपैकी आहेत. आपण जो जो विचार करू लागावे तो तो मती गुंग होण्याचा प्रसंग अनुभवास येतो. श्रीबाबांनी कधीही ब्रह्ममायेचा कोरडा काथ्याकूट कोणाशी केला नाही. कोणालाही कान फुंकून शिष्य केले नाही. 'इंग्रजासारखी' परधर्मीय राजसत्ता असताना फोडा, झोडा तत्वानेच राज्यकारभार चालू असताना, मुसलमानाना सरकारचा पूर्ण पाठिंबा असताना व जातीयवाद विकोपाला पोहोचला असताना एक व्यक्ति मशिदीत येते काय व मुसलमानांना अत्यंत चीड आणणारी कृत्ये करते काय व ती कृत्ये परधर्मीयांकडून बिनतक्रार सहन केली जातात हे मोठे आश्चर्य! ज्या कालात मशिदीवरून वाद्य वाजविणे म्हणजे दंग्याचेच आव्हान समजले जात असे, त्यावेळी शिरडीस मशिदीत घंटा वाजत असत आणि धुनी आपल्या सामर्थ्याने धगधगत असे. उभ्या आयुष्यात एकदा वेदांत चर्चा झालेली त्यांच्या ओवीबद्ध चरित्रात दिसते. ती म्हणजे त्यांच्या सन्निध्यात गीतापाठ करणाराला त्यांनी कुतुहलाने प्रश्न केला तेवढाच. पाठ करणारे गृहस्थ खालील श्लोक पुटपुटत होते. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानम् ज्ञानीनस्तत्त्वदर्शिनः।' यात इतकेच सूचित केले की, शब्दाने फक्त अज्ञान काय आहे हेच उपदेशिणे शक्य आहे. शब्दाने ज्ञानाचा अनुभव देता येत नाही आणि शास्त्रतः ते बरोबर आहे. 'यतो वाचा निवर्तंते' हा श्लोक हेच दाखवित आहे. यावरून संतांचे निरीक्षण किती खोल व परिपूर्ण असते याची कल्पना होईल, पण ती

त्यांची पूर्णतेची अवस्था सामान्य जनाला ओळखता येणे सहजसाध्य नसते. सत्य परीक्षक दुर्मिळ असतात. श्रीज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे : योगी ओळखावा योगेश्वरें। ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरें। महाचतुर तो महाचतुरें। ओळखावा ॥ समान भूमिकेवर आल्याखेरीज ओळख होणे कठीण असते. सत् तत्त्वात विलीन झालेल्या महात्म्यांची ओळख होण्याला आपणही तो अधिकार मिळवूनच गेले पाहिजे. ब्रह्म होऊन ब्रम्ह अनुभवावे. ब्रम्हाचा अनुभव ब्रम्ह होऊनच घ्यावा लागतो. वाचा, मन, बुद्धि यांना तो अशक्य आहे. श्रीबाबा हे अशा अचिंत्य अवस्थेत होते. कल्पनातीत अवस्थेतील कल्पना कल्पनेने येणे कशी शक्य आहे !

## बाबांची साधना

श्रीबाबांची साधना काय होती, ते कोणत्या उपास्य देवतेच्या साधनेत होते हे कोणाला काही समजण्यासारखे नव्हते. ते हिंदूच्या देवांची पूजाअर्चा, विधि या कर्मठमार्गाचे कर्मठ जंजाळातही कधी नव्हते व म्लेंच्छांच्या रिकाम्या नमाजाच्या आरडा ओरडीतही नव्हते. सर्वाभूती सहजसाक्षित्वाने प्रकाशणाऱ्या आत्म्यात ते विलीन झालेले होते. ज्या भूमिकेत मन गेले की पुन्हा ते परत कधीही येत नाही, अशा परिपूर्ण अवस्थेत ते होते. 'यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम्।' सहज उत्तम अवस्थेत ते मस्त असत. मस्त म्हणजे मी पणाचा ज्यांचा अस्त झालेला आहे ती परमोच्च अवस्था. मी पणाचे फवारे अनंत मार्गाने वृत्तिरूप धारण करून अज्ञानावस्थेत आत्मप्रकाशावर ढगाप्रमाणे आच्छादन करीत असतात. सर्व अनर्थांचे मूळ जे शरीर व त्याचा आधार घेऊन रहाणारा अहंकार, त्याची आपल्यासमोर धुनीत राखरांगोळी करून नाव, गाव, जात, गोत, कुल, शील या सर्वांची रक्षा करून स्वस्थ झालेल्या स्थितीत ते असत. स्वस्थ शब्दही हेच सुचवितो. स्वस्मिन् स्थितः। स्वात्म्यात स्थित झाल्याखेरीज स्वास्थ्य येणार नाही. हेच ते संताचे स्थान; हीच ती कृतार्थतेची स्थिति ! ज्या सुखाकरिता सर्व प्राणिमात्र धडपडत आहेत व जे त्याचे कल्पनेतही येऊ शकत नाही ती हीच स्थिति. येथेच तो कृतार्थ होतो. कर्तव्याकर्तव्याच्या जंजाळातून तो मोकळा होतो. सत् तत्त्वात त्याचा अंत होतो. हेच ते आपले मरण. व्यक्तित्व संपूर्णतेने नाहीसे होऊन अखंड स्थितीचे जीवन येणे हीच ती किमया. ऋषि मुनींनी शेकडो वर्षे तपे करून शोधून साधलेली ती हीच अवस्था. व्यक्तित्व हे क्षणिक आहे. सत्तत्व हे अखंड आहे. आपले अस्तित्व अखंड असावे हीच प्राणिमात्राची सुप्त इच्छा असते. मरण कोणालाही नको असते. अमृतत्वाकरिताच जीवमात्राचा अखंड प्रयत्न असतो. परंतु त्याचे स्थान अज्ञान अवस्थेत निश्चित होत नसते. दिवा घेऊन अंधार शोधण्याच्या कृतीप्रमाणेच विफलता पदरी पडते. त्यातून सोडवणूक करून घ्यावयाची असल्यास संतांना शरण जाणे हा एकच मार्ग आहे. सर्व धर्मामाजी परमधर्म स्वरूपी

रहाणे हाच स्वधर्म. अशा धर्माच्या प्रतिष्ठेकरिता श्रीभगवान गीतेमध्ये 'सर्वधर्मान् परित्यज्यमाम् एकम् शरणं व्रज' अशी ग्वाही देत आहेत. अशा परमधर्माचरणात संत असतात–त्यांचे भक्तीचे स्वरूप वस्तुतंत्र असते. म्हणजे परमेश्वर व आपण एकरूप या अखंड अनुभवात ते असतात. कर्तृतंत्राचा तेथे संबंधच येत नाही. 'जे अनयासे अभ्यासिता न ये, जे साधनें साधिता न ये,' ही ती स्थिती. अशा कल्पनातीत स्थितीत असलेल्या संतांचे स्वरूपाची ओळख सामान्य जनाला सहजासहजी होत नाही ती अनुभवानेच पायरी पायरीने होऊ शकते. श्रीबाबांच्या कल्पनातीत स्थितीचा आपण जसा यथामती विचार केला तसा त्यांचे व्यावहारिक बाह्य कृतीचा थोडा विचार करू.

## न बोलता देव त्याचा कैवारी

श्रीबाबांची अथपासून इतिपर्यंत सर्वच कृती उपदेशाची; पण ते घेणाराला. श्रीज्ञानेश्वरांना जसे नदी, दिवा, पृथ्वी, वृक्ष इत्यादि सर्वांपासूनच शिक्षण मिळत असे तसे काव्यदृष्टीने जगाकडे पहाणाऱ्याला सर्व जग गुरूप्रमाणे एकच गोष्ट दाखविते. सर्वात समन्वय आहे असे दिसेल. सर्व जगाचे व्यवहार ज्या पंचभूतांच्या आधारावर चालतात ते सर्व विरुद्ध धर्मवान् असूनही जगताचे भरण-पोषण करतात असेच दिसते. तसेच संतांनी जो आपल्या आचाराने आपला उपदेश केवळ बोलून न दाखविता कृतीने दाखविला तो केव्हाही अधिकच परिणामकारक व टिकाऊ असतो.

कोणाही व्यक्तीला आपल्या नावाचा, लौकिकाचा, घराण्याचा, जातीचा, देशाचा केवढा तरी अहंकार असतो. परमार्थमार्गामध्ये अहंकारासारखा दुसरा शत्रू नाही असे वर्णन सर्व संतांनी केलेले आहे. **मुख्य ते गळाली पाहिजे अहंता। उपदेश घेतां गोड वाटे।** तसेच अहंकाराचा वारा न लागे राजसा। माझीया विष्णुदासा भाविकाशी। ममत्व सुटणे, अहंत्व सुटणे फार कठीण आहे. ते प्रत्यक्ष सुटलेले कोठे पाहावयाचे असेल तर संतांच्या आचारात पहावयास सापडते. द्रव्याचा मोह, स्त्री-मोह, नावलौकिकाचा मोह हे अत्यंत अनावर म्हणून शास्त्रकारांनी वर्णिलेले आहे. ज्ञानेश्वरांनी तर त्यांचे अगदी काव्यात्मक वर्णन करून योग्य संभावना केली असून, त्यांचे स्वरुप स्पष्ट केलेले आहे. "हे तो भजन मार्गीचे मार्ग। मारक ऐसे।" इत्यादि. इतकी बलवत्तर पकड वरील विकारांची असताना संत-महात्मे यांचे आचरणात आपणाला त्यांचा मागमूसही दिसत नाही, श्रीबाबांचे चरित्रावरून आपणास हे स्पष्ट दिसून येते.

जसा ब्रह्माला अनादि शब्द यथार्थ शोभतो तसेच श्रीबाबांचेही दिसते. त्यांच्या जन्मस्थानाचा निश्चित पत्ता अद्याप नाही. कदाचित् पोरके पोर एखादे असू शकते; त्याचे आई, वडील, भाऊ वगैरे सर्व लहानपणी नाहीसे होणेही शक्य असते; परंतु

इतर अवळगासचे नातेवाईक किंवा बांधववर्ग सर्वच काही एक नाही ! निदान इतक्या योग्यतेस पोहोचलेल्या व्यक्तीच्या भाऊबंद मंडळीपैकी कोणीही आपल्या कुळातील ही संतव्यक्ती आहे असे अद्याप स्पष्ट सांगू शकत नाही. असो.

देह प्राप्त झाला तो जगरहाटीप्रमाणे कोणातरी महान स्त्री-पुरुषापासूनच झाला असणार हे खरे, आणि तसा जन्म प्राप्त होणे काही सदोष आहे असेही नाही. प्रत्यक्ष श्रीनिवृत्ति, ज्ञानदेव, इत्यादि संत-महात्मे यांनाही जगरहाटीच्या नियमाप्रमाणेच आपले देह घ्यावे लागले. असा देह मृत्युलोकात प्राप्त होण्याकरिता प्रत्यक्ष देवसुद्धा इच्छा करतात. 'इहलोकींचा हा देह देव इच्छिताती पाहे.' असो. हा जन्माचा प्रश्न झाला. तो प्रश्न निर्णयात्मक न सुटल्यामुळे त्यांच्या जातींविषयीही अनेक कल्पना अनेकांकडून केल्या जात आहेत. विचारपूर्वक पाहू गेल्यास सृष्टीनिर्मात्याने स्त्री-पुरुष या दोनच भिन्न सृष्टींची उत्पत्ती केली. मनुष्याने मात्र त्यावर मात करून आपल्या सात्त्विक, राजस, तामस, गुण कर्मविभागाने अनेक जाती निर्माण केल्या व वर्गकलहाची उत्पत्ति केली. गुणकर्मविभागशः भिन्नत्व निराळे आणि जातीय विभाग निराळा. गुण व कर्म या नियमाने असलेले भिन्नत्व फार सौम्य असू शकेल. जन्माप्रमाणे जात ठरणे हे त्याचे विकृत स्वरूप आहे. मनुष्यजात जी परमेश्वराने निर्मिली त्यात आम्ही हिंदु, आम्ही इंग्रज, आम्ही मुसलमान वगैरे जे भिन्नत्व आपण आज पहातो ते मनुष्यवृत्तीचे फळ आहे. खरोखरीने पाहू गेल्यास प्रत्येक प्राणीमात्राची शेवटची अवस्था पंचभूतात विलीन होणे ही स्पष्ट दिसत असताना जीवित असेपर्यंत मात्र आम्ही पूर्ण भिन्नत्वात जीवन कष्टमय करून घेतले आहे.

परमेश्वराने सूर्य, पृथ्वी, इत्यादि पंचभूते निर्माण केली ती मात्र ख्रिश्चन, मुसलमान, हिंदु या सर्वांची एक व परमेश्वर मात्र निराळा, हा कोठला विचारीपणा ? वास्तविक मुसलमानांचा अल्ला, ख्रिश्चनांचा आकाशातला बाप व हिंदूंचा परमेश्वर सर्व एक आहे, हे जर सर्वांच्या अनुभवात आले तर धर्मयुद्धे तरी खास होणार नाहीत. ख्रिश्चन व मुस्लिम या धर्मात दास्यभाव आहे. परमेश्वर व भक्त भिन्न आहेत. हिंदुधर्मात मात्र स्वामीभाव आहे. परमेश्वर व भक्त एकरूप आहेत. इतर धर्मापेक्षा वैदिकधर्मात वैशिष्ट्य आहे ते हेच. वैदिकधर्माचा भौतिकशास्त्राशी विरोध येणे कधीच शक्य नाही. ख्रिश्चनधर्माशी भौतिक शास्त्रज्ञांचा जो विरोध आलेला दिसतो त्याचे स्पष्टीकरण हेच आहे.

जगाच्या अंतिम तत्त्वाच्या शोधार्थ शास्त्रज्ञ आयुष्याचे आयुष्य खर्च करीत आहेत. त्याच अंतिम तत्त्वाचा संपूर्ण शोध करून स्वानुभवात रंगलेले आमच्याकडील संत-महात्मे आहेत. शास्त्रज्ञांना बुद्धीच्या करामतीवर एखाददुसरा निसर्गातला

नियम सापडतो न सापडतो तोच इतर अनंत अगम्य तत्त्वे मनःचक्षुंपुढे उभी राहतात; व अज्ञानाचा पडदा अधिक गडद झालेला दिसतो. वैदिक परंपरेत या जगताच्या शोधार्थ अनेक प्रयत्न पूर्वजांनी करून, हे जग अनंत आहे हा निश्चित सिद्धांत बुद्धिवर ठसवून त्याही पुढे जाऊन जगाच्या अंतीम तत्त्वावर बुद्धि स्थिर करून ब्रह्मानुभवात बुडी घेतलेली स्पष्ट दिसत आहे.

प्रश्न उत्पन्न होतो तो फक्त इतकाच की, हा ब्रह्मानुभव कसा मिळवावा हाच. पाश्चात्य बुद्धिवादीवर्गात याबद्दल फार चिकित्सक दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. 'रिझनिंग अँड फेथ' हा वाद फार तीव्रतेने तिकडे अनेक विद्वान लेखकांनी माज-विला आहे. बुद्धीचा प्रांत संपल्याशिवाय श्रद्धेच्या प्रांतात शिरकाव होणे अत्यंत कठीण आहे. बहिर्मुखतेने ती गोष्ट कधीही शक्य नाही. विवेकयुक्त वैराग्याशिवाय जागतिक मोह व मानसिक वैचारिक बंधनातून बुद्धि मुक्त होणे शक्य नाही. अंतर्मुखतेनेच ते शक्य आहे. त्या अंतर्मुखतेकरिता संतमहात्मे यांचे साहाय्य लागते. सद्‌गुरुवांचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं आधीं॥ ही समर्थोक्ति त्या ठिकाणी यथार्थ वाटते. बुद्धीचा प्रांत सुचणार कसा व श्रद्धा निर्माण होणार कशी? 'श्रद्धावान् लाभते ज्ञानम्' हे जगाचे आधिभौतिक ज्ञानाल अंशतः सत्य आहे. या बुद्धीचे अपूर्णतेमुळे साधक पुष्कळ श्रवण करूनही असाहाय्य होतो. बुद्धिवादाप्रमाणे इथरपर्यंत येऊन अनेक तऱ्हेचे इथर्स आहेत असे कळून इथरमधील कार्यकारणांची परंपरा कोणाकडे व का द्यावयाची हे निश्चित होत नाही व बुद्धि लंगडी पडते त्यावेळी न वचसा, न मनसा, न बुध्या या शास्त्रवचनाची प्रचीति येते. अशावेळी निश्चयात्मक परमेश्वरी अनुभव करून देणाऱ्या संत महात्म्यांखेरीज मनाला कोणाचाच आधार सापडत नाही. ते मात्र याच देही याच डोळा मुक्तीचा सोहळा, अशा निश्चयाने जगताचे आदि-तत्त्वाचा अनुभव करून देण्याची जबाबदारी घेताना दिसतात व मनुष्य सहाजिकच त्यांचेकडे वळतो. 'तुका म्हणे माझा संतांवरी विश्वास.' कां तर 'तेची माझे हित करीती तात्काळ' या ठिकाणी हित म्हणजे व्यावहारिक हित इतका क्षुद्र अर्थ न घेता तुकाराम महाराजांचे दृष्टीने आत्महित अभिप्रेत आहे.

## संतांना जात नसते

आम्ही आज श्रीबाबांकडे याच आशेने पहात आहोत. ते आज जग सोडून गेले असले तरी ते आहेत असा अनुभव येतो. 'काया गेली खरी। परी मी आहे जगदंतरी', ही उक्ती सार्थ वाटते. याच अनुभवाने प्रत्येक भक्त शिरडीस धाव घेत आहे. प्रश्न इतकाच आहे की, आज ते शरीरधारी नसताना ते मार्गदर्शन कसे करणार व आम्ही ते कसे करून घेणार? आमची

प्रार्थना त्यांना कोठल्या भाषेने कळत असेल? हे प्रश्न आपण पुन्हा केव्हातरी पाहू. मुख्यतः श्रीबाबांची जात कोणती हा प्रश्न आपणापुढे आहे. संतांची जात ठरलेली नसते. संतांची जात कोणती हे तुकाराम महाराज सांगतात त्याप्रमाणे —संतांना जात नसते. त्यांना फक्त त्यांचे जातीचा मनुष्य हवा असतो. 'माझ्या जातीचा मज भेटो कोणी। आवडीची धनी पुरवावी देवा,' त्यांना एकच जात; ती म्हणजे, पशुत्वातून मनुष्यत्वाकडे व मनुष्यत्वातून देवत्वाकडे नेणारी माणुसकीची जात त्यांना हवी आहे. ज्यांनी आपले नावगाव यांचा संकुचित विचार सोडला त्यांना जातीचा विचार कोठला? माणसाने माणसासारखे वागावे. मनुष्यत्वाने रहावे. मनुष्यत्व म्हणजे काय? मननशील रहाणे हा मनुष्यधर्म. आपणास असे व जे हवे तसेच इतर मनुष्यांसही हवे अशा आत्मोपम्य बुद्धीने वागणे ही समत्वबुद्धि मनुष्यधर्माची मुहूर्तमेढ आहे. त्यात जात, देश, वंश, जमात यांचा विचार गौण आहे. श्री रामतीर्थ म्हणत की, माझ्या अंगरख्याचा एक खिसा हिंदुस्थान आहे तर दुसरा खिसा विलायत आहे. मुद्दा काय की महात्म्यांची दृष्टी आपल्या देशबांधवाचेच फक्त कल्याण व्हावे इतकी संकुचित नसून अखिल मानव जातीसंबंधी विचार करणारी असते. आपले साने गुरुजी नेहमी उपदेश करीत त्याप्रमाणे आपण सारे भाऊ भाऊ हेच ते मानवाचे मनुष्यत्व.

याच मनुष्यत्वाने श्रीबाबा आयुष्यभर वागले. 'अल्ला ईश्वर एकच देव। राम रहिम हे एकची नाव.' ही उदात्त शिकवण त्यांनी आचरून दाखविली. मंदिरात नमाज पढला जातो व मशिदीत भजन होते ही कृती काय दाखविते? आपल्या एकत्वाचे प्रभावाने अल्ला ईश्वराचे एकत्व सिद्ध करते.

## मानव्याची दृष्टी

हीच मानव्याची दृष्टि आम्ही, श्रीमंत गरीब, मालक मजूर, अधिकारी सेवक, इत्यादि भिन्न वर्गात ठेवून वागू लागलो तर आम्हाला आज दिसणारा जातीयतावाद व विषमता यांना थोडाही थारा न मिळून स्वराज्याचे सुराज्य होण्यास कालावधी लागणार नाही. 'हेच थोर भक्ती आवडते देवा.' परमेश्वराचे निश्चित स्वरूपासंबंधी तुकाराम महाराजांचे खालील वचन फार महत्त्वाचे आहे. 'प्रीती जे स्वपुत्राशी तेच दासा आणि दासी। तुका म्हणे सांगू किती, तेचि भगवंताची मूर्ती.'

संतांच्या कार्याचे महत्व आहे ते हेच. जे कार्य राजदंड करू शकत नाही, जे कार्य राजा करू शकत नाही ते कार्य संत-महात्मे सहज करू शकतात.

**न राज्य नैव राजाच, न दण्ड यो न च दाण्डिका।**
**धर्मेणेव प्रजा सर्वे, रक्षान्ती स्म परस्परम्।**

अनेक आपत्ति आल्या, अनेक राज्यक्रांतीना आम्हास तोंड द्यावे लागले तरी संतांच्या धर्मकार्यामुळे आमची संस्कृती टिकली, याचे एकच कारण श्रीसंत, महात्मे यांनी आमची निश्चित ठेवलेली धर्मबुद्धि. आमच्याकडे शिक्षणाबरोबर सुसंस्कृतीला स्थैर्य आले ते संतांच्या शिकवणीचे महात्म्य आहे. शतकानुशतके लोटली तरी 'ज्ञानोबामाऊली तुकाराम' या गर्जनेने आम्ही सर्व एकजीव होऊ शकतो हे आजही सर्वांना दिसतच आहे. हाच अनुभव श्री विवेकानंद परदेशात जाऊन गर्जना करून परधर्मीयांपुढे वर मान करून मोठ्या अभिमानाने आमच्या देशाबद्दल व धर्माबद्दल बोलताना काढतात- 'Religion is the back bone of India.' आणि आजही आपण जात पात, वय धंदा, गरीबी श्रीमंती, अधिकार ह्या सर्व भेदाना विसरून श्रीसंतपदी एकरूप होत आहोत हा महान् भाग्याचा दिवस आहे. हीच सर्वांची बुद्धि दृढ होण्याकरिता आपण सर्वजण श्रीसंतशिरोमणी ज्ञानेश्वर यांच्या शब्दात परमेश्वराची प्रार्थना करून कृतार्थ होण्याकरिता दान मागू —

**आतां विश्वात्मकें देवे। येणें वाग्यज्ञे तोषावे तोषोन मज द्यावे। पसायदान॥ जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचे॥ दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात। 卐**

# १२ मे स साईनिकेतनमधे भव्य सोहळा

## श्री साईभक्तांना आग्रहाचे आमंत्रण

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील 'साई निकेतन' कार्यालयात शुक्रवार दिनांक १२ मे १९७८ रोजी श्रीसाईबाबांच्या सुंदर संगमरवरी पुतळ्याचा प्राणप्रतिष्ठा समारंभ साजरा होत आहे. श्रीसाईंची ही भव्य मूर्ती बोरीवलीचे उद्योगपती श्री. वसंतराव संघवी यांनी संस्थेला भेटीदाखल दिली असून तिची उंची सुमारे तीन फूट आहे व ती मुंबईतील शिल्पकार श्री. हरीश तालीम यांनी घडविली आहे.

मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा समारंभ यादिवशी सकाळी ८ ते ९-३० चे दरम्यान शुभमुहूर्तावर होत असून संस्थेचे कार्यालय संपूर्ण दिवसभर भक्तांना श्रीसाईदर्शनासाठी खुले राहील. दुपारी १२, सायं. ७ व रात्री १० चे आरती नंतर कार्यक्रम संपेल. सायं. ७ नंतर मुंबापुरीतील काही नामवंत गायक मंडळी श्रीसाईदरबारात हजेरी लावणार आहेत. तरी साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून एकंदर कार्यक्रमास हजर राहून शोभा आणावी अशी विनंती.

का. सी. पाठक, कोर्ट रिसिव्हर

गाठी-भेटी – ३९

### हेमाडपंतांचे श्रीसाईभक्त चिरंजीव

# डॉ. गजानन गोविंद दाभोळकर

● सदानंद चेंदवणकर
१२०/४०५५ राधामाधव, टिळकनगर,
मु. पो. चेंबुर, मुंबई ४०००८९



● श्रीसाई सच्चरित्र ही भगवान श्रीसाईबाबांची अधिकृत व अमर अशी पोथी आहे. ती बांद्र्याचे त्यावेळचे पहिल्या वर्गाचे सिटी सिव्हिल कोर्टाचे न्यायमूर्ती श्री. गोविंदराव दाभोळकर यांनी लिहिली. ही पोथी त्यांनी श्रीबाबांना स्वतः वाचून दाखविली व बाबांनी ती स्वतः आपल्या कानांनी ऐकली आहे. गोविंदराव उर्फ

अण्णासाहेबांना साईबाबा, ‘ हेमाडपंत ’ अशी मोठ्या प्रेमाने हाक मारीत असत. या हेमाडपंताना एकुलते एक पुत्र व पाच कन्या अशी अपत्य संपदा लाभली.

हेमाडपंतांचे एकुलते एक चिरंजीव गजाननराव यांनी आपल्या आयुष्यात उत्तमपैकी डॉक्टर म्हणून लौकीक मिळविला. त्यांचे आज वय ७५ वर्षांचे आहे. श्रीसाईबाबा असताना ते चांगले १५ वर्षांचे होते. त्यांची शरीरप्रकृती श्रीसाईकृपेने आज चांगली आहे ते बांद्र्याहून दादरला भाजी बाजारासाठी किंवा इतर खरेदीसाठी आगगाडीतून अगदी एकटेसुद्धा येतात.

त्यांचा जन्म २३ सप्टें १९०३ रोजी बांद्रा येथे झाला. त्यांच्या मातोश्रींचे नाव रुक्मिणी. त्यांचे प्राथमिक शिक्षण बांद्र्याला व त्यापुढील मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण गिरगावातल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत झाले. १९१८ साली ते मॅट्रिक झाले व मुंबईच्या टोपीवाला नॅशनल मेडीकल कॉलेजातून ते १९२१ साली एल.सी. पी. एस. ची डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२१ पासून १९७१ पर्यंत त्यांनी वैद्यकीचा व्यवसाय उत्तम प्रकारे केला. पुढे त्यांना १९७१ त अर्धांग वायूचा झटका आला त्यातून ते बरेचसे सावरले असले तरी आपली खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस त्यांनी नाईलाजाने थांबविली. डॉ. गजाननरावांचे वडील हेमाडपंत १५ जुलै १९२९ रोजी स्वर्गवासी झाले. डॉ. गजाननरावांचा विवाह १९२५ साली झाला. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. वसंत व अरविंद असे दोन पुत्र व तीन कन्यका एवढी अपत्य संपदा त्यांना लाभली. पैकी सर्व कन्यका विवाहीत असून डॉक्टरसाहेब सध्या आपले चिरंजीव श्री. अरविंदराव यांचेकडेच राहतात. ज्या वास्तूत श्रीबाबांच्या चरित्राचे संपूर्ण लेखन कार्य झाले त्याच वास्तूत ही मंडळी सध्या आहेत हे केवढे मोठे भाग्य आहे. श्री. दाभोळकरांच्या देव्हाऱ्यात कुठूनतरी अचानकपणे एकदा श्रीसाईबाबांची फ्रेम केलेली मूर्ति (ती श्रीसाईकडूनच आली अशी सान्यांची श्रद्धा आहे) अगदी भर दुपारी दृष्टांत देऊन जेवायच्या वेळेला आली खरी, तिची श्रद्धायुक्त अंतःकरणाने दरदिवशी ते पूजा अर्चा करतात. आजवर असंख्य भाविक या मूर्तीचे दर्शन घेऊन गेलेले आहेत. श्रीबाबांनी दाभोळकर कुटुंबाला दिलेले रुपये आजही त्यांच्या देव्हाऱ्यात पूजेला लावलेले आहेत. त्यांच्याकडे आलेल्या श्रीसाईमूर्तीचा उल्लेख श्रीसाईसत्‌चरित्रातील ४० व्या अध्यायात देण्यात आलेला आहे. डॉ. गजानन-रावांच्या पाच कन्यकांच्यापैकी एकच कन्यका आज हयात आहेत. त्यांचे नाव आहे दुर्गाताई. त्यांचे वय सध्या ७८ वर्षांचे आहे. त्या एम. बी. बी. एस. असून परळ दामोदर हॉल जवळ त्या प्रॅक्टिस करीत असत.

डॉ. श्री. गजाननराव दाभोळकर यांना श्रीसाईबाबांचे आपणास अगदी

पहिल्या प्रथम दर्शन कसे काय झाले? शिरडीची जुनी माहिती किंवा त्यावेळी शिरडी कशी काय दिसली. एकंदर परिसर कसा काय होता याबद्दल विचारता त्यांनी फार रंजक माहिती सांगितली. ते सांगतात, "त्यावेळी मी १३-१४ वर्षांचा असेन, माझे वडील कै. परमपूज्य अण्णासाहेब दाभोळकर शिरडीस जाण्यास निघाले. वडिलांचे बरोबर जाण्याचा रडवा हट्ट धरून मी पण त्यांच्याबरोबर गेलो. शिरडीस कशासाठी जावयाचे, साईबाबा म्हणजे काय इत्यादीबद्दल किंचित्‌ही कल्पना त्या बालवयात मला नव्हती. केवळ दूरचा गाडीचा प्रवास, परगावी जाण्याचे आकर्षण, चैन, मजा, इ. कल्पनातरंगांनी भारूनच जाण्यात आनंद." श्री. दाभोळकर पुढे सांगतात,

"त्यावेळी शिरडी गाव आजच्या सारखं नव्हतच. गाव अक्षरशः ओसाड होतं. पंधरावीस मातीची घरं काय ती होती. एक मशीद, मोडकळीस आलेली शाळा, गावाबाहेर एक मारुतीचे देऊळ व पाटलाची चावडी, पाहुणेमंडळीस उतरण्यासाठी त्यावेळी तिथे बापूसाहेब साठे यांचा एक मोठासा वाडा होता त्यात आम्ही उतरलो. प्रातःविधी वगैरे आटोपून मी वडिलांचे बरोबर श्रीसाई-बाबांच्या दर्शनास मशिदीत गेलो.

मशिद म्हणजे त्यावेळी एक तीन भिंती असलेले व वरुन माळवदासारखे छप्पर, पुढे मोठा ओटा दोन बाजूस दोन लहान कठडे, आत एक चौरस दालन, समोर एक उकीरडावजा मोकळे खडबडीत पटांगण.

आम्ही पायऱ्या चढून आत गेलो, उजवीकडील कठड्यास डावा हात टेकून एक फकीरासारखा दिसणारा पुरुष, डोक्याला फडके बांधलेला, अंगात फाटकी मळकी पायघोळ कफनी घातलेला, भिंतीला टेकून एका फाटक्या गोणपाटावर उकी-डवा बसलेला असा दिसला, हेच ते "साईबाबा" असावेत असे मी ताडले.

आम्ही बापलेक त्यांच्या पाया जवळ जाऊन बसलो. जवळपास पंधरावीस मंडळी, गावकरी, पाहुणे हिंदु व मुसलमानही बसलेले होते. कोणी पाय रगडीत आहेत. कोणी चिलीम भरून बाबांना देत आहेत वगैरे वगैरे दृश्ये पाहिली. बाहेर अंगणात गावची लहान मोठी मुले एकच गोंगाट करून, "बाबा बाबा, साईबाबा" म्हणून किलबिलाट करीत होती. हेतू हाकी कोणी नारळ फोडला अगर प्रसादासाठी पेढे, फुटाणे, खडीसाखर इ. अर्पण केली की बाबांनी ती जवळपास बसलेल्या मंडळींना वाटून बाकीचा भाग त्या मुलांच्या अंगावर भिरकवावा आणि मग त्या बाळगोपा-ळांनी एकच गोंधळ घालून ज्याला मिळेल, तसा झडप घालून यथेच्छ हस्तगत करून खावा माझे मन या गंमतीतच रमून गेले.

कै. माधवराव देशपांडे म्हणून त्यावेळचे बाबांच्या अगदी खास सलगीतले एक ब्रह्मवृंद, बाबांच्या सान्निध्यात तिथे नेहमी असत. ते आलेल्या पै-पाहुणे मंडळींची ओळख पाळख करून देण्या-घेण्याच्या कामी फार उपयोगी पडत. त्यांना बाबा 'शामा' या टोपण नावाने हाक मारीत. हे माधवराव त्या शिर्डी क्षेत्रातील एक बडवेवजा उपयुक्त व्यक्ती भासत असे. कोणाला काही स्वतःबद्दल बाबांकडे गोष्ट काढणे असल्यास यांचे मार्फत त्यांचे काम सोळा आणे झालेच पाहिजे. मशिदीत आल्या गेल्याची विचारपूस श्रीसाईबाबा स्वतः व्यक्तीगत करीत व प्रेमाने ज्यांचे त्यांचे समाधान होईतोपर्यंत त्यांच्याशी बोलत असत. "जयामनी जैसा भाव, तया तैसा अनुभव" हे प्रत्यक्ष अनुभवण्याचे तेच एक स्थान असे. लहान मुलांच्याबद्दल बाबांना फारच ओढा असे. मी तिथे पायाजवळ बसलेला असताना मला हाती धरून "बापू" अशी हाक मारून आपल्या जवळ अगदी बिलगून बसविले, गोंजारले, कुशीत घेतले. मला अगदी गहिवरून आले. त्यावेळी गरीब श्रीमंत कुणीही येवोत, त्यांची विचारपूस स्वतः बाबा फार आदराने करून, त्याच्याकडून पूजा–अर्चा वगैरे करवून घेत व त्याला आपलासा करून घेत.

इतके होईतोपर्यंत दुपारची मध्यान्हाची वेळ होई. बापूसाहेब जोग यांच्या पदरी त्यांचा एक आचारी श्री. मेघा हा होता. तो एक प्रथम निस्सीम शंकर भक्त होता, परंतु नंतर नंतर तो बाबा भक्त बनला. बाबांची तो षोडशोपचारे पूजा करी व नंतर पंचारती हाती घेऊन एका पायावर ताठ उभा राहून दीड तास सबंध आरती होईतोपर्यंत निश्चल उभा राहून आरती करी. त्याचे हे कौशल्य बघून मला मोठे कौतुक वाटत असे.

श्रीबाबांची त्यावेळची ती प्रसन्न मुद्रा ज्या भाग्यवान प्राण्याने पाहिली असेल तो खरंच धन्य समजावा. आरती तीर्थप्रसाद आटोपल्यावर बाबा स्वतः बसल्या जागेवरून उठून धुनी जवळ जाऊन उभे राहात व तिथे असलेल्या प्रत्येक इसमास स्वहस्ताने धुनीतील ऊन ऊन उदी मूठ भरून देऊन, त्यांच्या मस्तकावर तो उदीने माखलेला हात पाचही बोटे उठतील अशा जोराने धाडदिशी आपटून मारीत. किती आल्हाद होई त्यावेळी! किती रम्य तो सोहळा!! सगळया अष्ट सात्विक भावना उचंबळून येत. वाटे की हलूच नये त्या मशिदीतून. वारंवार तो वरदहस्त शिरोभागी उमटवून घ्यावा, माझ्या कोवळया वयात मनावर घडलेले ते सुसंस्कार आज माझे कामी येत आहेत. केवढे उपकार करून ठेवले आहेत माझ्या वडिलांनी माझ्यावर! वारंवार आपल्या बरोबर श्रींच्या दर्शनास नेऊन त्या महान सत्पुरुषाची, सद्गुरु श्रीसाईनाथ महाराजांची कायमची सांगड घालून दिली आहे माझी."

"एवढे सर्व झाल्यावर बाबा जमलेल्या मंडळीस म्हणत," काका, नाना जा आता भुका लागल्या असतील. जेवणखाण करा, थोडी वामकुक्षी करा व मग या दोन पाराला, आपण बोलू चालू व बसून अल्लाचे नाव घेऊ." पण त्या मंडळींचे मशीदमाईतून पाय हलण्यास कबूलच होईनात. पोटात जरी कावळे काव कावीत होते तरी वाटे की, या प्रेमळ सत्पुरुषाच्या सहवासातून सुद्धा हलूच नये, तासनतास बसून रहावे. त्यांच्यात असे काय आकर्षण होते की ते त्यावेळी माझ्या बालबुद्धीला जरी समजत नव्हते तरी वडीलधारी मंडळी अक्षरशः मंत्रमुग्ध होत असत, हे मात्र मला निश्चित दिसून येई. सर्व मंडळी घरोघर गेल्यावर श्रीबाबा इतर फकीर गणासमवेत, भिक्षा मागून आणलेल्या अन्नाचा व नैवेद्य वगैरे जमलेल्याचा एकत्र बसुन एका थाळयात समावेश करून भोजन करीत.

आज मी मोठा झालो आहे. वयाने, मनाने, अर्थाने पण त्यावेळची ती मशिदमाई व ती मधील ते एकंदर नित्याचे वातावरण, आज या घडीला माझ्या स्मृती पटलावर कायमचा ठसा उमटवून राहिले आहे."

डॉ. श्री. गजाननराव दाभोळकर हे शिर्डीसंस्थानच्या कमेटीतील एक चिटणीस म्हणून सुरुवातीस सात आठ वर्षे काम पहात होते. त्यावेळी डॉ. गव्हाणकर, श्रीराधाकृष्णस्वामी ही मंडळीही त्यांच्या समवेत होती. अजुनही डॉ. गजाननराव बाबांची जशी जमेल तशी पूजा करतात व दर गुरुवारी बाबांची आपल्या गृही-साईनिवास-इतमामाने आरती करतात. ●

# युगावतार श्रीसाईबाबा : १३

## [ श्रीसाईबाब सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने ]

अनुवाद :- श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅनशन, ताडदेव रोड, मुं. ७

● सद्‌गुरुला अनन्यभावे शरण गेलेल्या साधकाला इतस्ततः भटकण्याची काहीही जरूरी पडत नाही. ह्याचे कारण सद्‌गुरु सर्वशक्तिमान असतात. एवढेच काय, सद्‌गुरुंच्या चरणी सर्व तीर्थांचे व नद्यांचे पावित्र्य वसत असल्याकारणाने

त्यांच्या शिष्याला तीर्थयात्रेला सुद्धा मुद्दाम जाण्याचे प्रयोजन नसते. सद्गुरूंनी संकल्प करण्याचाच अवकाश, शेकडो मैल दूर वाहणारी गंगा, गोदावरी त्यांच्या चरणकमलांपाशी येऊन साक्षात् हजर!

श्रीसाईनाथांचे एक परमभक्त बापूसाहेब जोग ह्यांना आलेला ह्याबाबतीतील एक अनुभव उल्लेखनीय आहे. एकदा एका अत्यंत अपूर्व अशा पर्वणीच्या प्रसंगी बापूसाहेब सहकुटुंब शिरडीला मुक्कामाला होते. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे कोपरगावला जाऊन गोदावरीत स्नान करण्याचे त्यांनी ठरविले. नेहेमीच्या शिरस्त्याप्रमाणे आदल्या दिवशी बापूसाहेबांनी गोदावरीत स्नान करण्याची श्रीबाबांकडे परवानगी मागितली. श्रीबाबा उद्गारले, "बापू! उद्या सकाळी आपण त्याचा विचार करू." काहीशा अधीरपणे बापूसाहेब म्हणाले, "सकाळी साताच्या शुभमुहूर्तावर स्नान करावयाचे म्हणजे पहाटे चार वाजता उठून निघावयास हवे." श्रीबाबा पुन्हा शांतपणे म्हणाले, "बापू! उद्या सकाळी त्याचा विचार करु." श्रीबाबांचे उत्तर ऐकून बापूसाहेब फारच नाराज झाले. अशा अपूर्व पर्वणीच्या प्रसंगी स्नान चुकणार की काय ह्या काळजीने बापूसाहेबांचा रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही.

पहाटे काकड आरतीला बापूसाहेब हजर झाले. आरती चालू असता गावात एकाएकी आरडाओरड चाललेली ऐकू येऊ लागली. बाजूच्या शिवमंदिराच्या आवारात गोदावरीचे पाणी वेगाने शिरले. दोही बाजूली पाणी भरू लागले. श्रीसाईबाबांनी बापूसाहेबांना जवळ बोलावून सांगितले, "बापू! संबंध रात्रभर जागरण करून तू मला दोष देत होतास पण अल्ला किती दयाळू आहे बघ. गंगा आपल्या पावली अंगणात आली आहे बघ. जा, आता मनसोक्त गंगेत स्नान कर चल आटप, शुभवेळ टळू देऊ नकोस."

श्रीबाबांची आज्ञा तंतोतंत पाळून बापूसाहेबांनी पर्वणीकाळच्या गोदास्नानाचे पुण्य पदरी पाडून घेतले. गोदेचे पाणी शिरडीच्या आवारात असे अचानकपणे येऊन थडकेल ह्याची कोणालाही सुतराम् कल्पनाही नव्हती. आदल्या रात्री गावातल्या एका शेतीच्या बांधाला भगदाड पडून गोदावरीचे पाणी जोरात वाहू लागले होते. पर्वणीच्या शुभदिनी गंगास्नानाची बापूसाहेबांची व इतर भक्तांची इच्छा अशाप्रकारे श्रीबाबांनी पूर्ण केली.

दुपारी आरतीच्या वेळेस सकाळी घडलेल्या प्रसंगाची आठवण बापूसाहेब जमलेल्या मंडळींना सांगत असता श्रीबाबा म्हणाले, "अरे बापू! देव लईच कनवाळू आहे. आपण त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवीत नाही म्हणूनच आपल्याला पावलोपावली पस्तावण्याची पाळी येते. सबुरी म्हणजेच अढळ श्रद्धा. श्रद्धा आणि सबुरी काही वेगवेगळया नाहीत."

# साईनामी दंगलो !

श्री. व्ही. एस. आकेरकर
साई निवास, मु. पो. पाट, ता. कुडाळ.

**वेड मज माझ्या कृपाळू साईचे ।**
**सोने जीवनाचे केले त्याने ॥**

कुणी काही म्हणो, मी वेडा ठरो. मी अज्ञानी लोकाकडून वेडा ठरलो नामात ! बाबा नाही का वेडे ठरले होते ? मग मी तर एक क्षुद्र पामर ! पण मी असाच वेडा रहाणार, आणि तोहि वेडावून सोडणारा माझा सर्व साक्षी 'श्रीसाई' ! ! माझं मन, माझी काया, सारं सारं साईच्या पायी घिरट्या घालीत आहे का कोण जाणे ? कशा-साठी घालीते हे ? माझे मलाच समजत नाही. मी देहाने नटाची भूमिका घेत असलो तरी माझं मन मात्र अखंड 'साई'नामात दंग ! माझ्या देव्हाऱ्यात 'शिर्डी' दिसते. अंतर्यामी उत्कट प्रेम असणाऱ्या एका क्षुद्राला शिर्डीच दिसते ! वेड्यानो खुशाल हंसा ! !

**जनाबाई संगे दळाया बैसला विठ्ठल ।**
**मग शिर्डी हे माझे घरकूल ॥**

देव भावाचा भुकेलेला—प्रीतीच्या थेंबासाठी भुकेला आहे ! भक्तिने अर्पण केलेले पान, फुल, फळ किंवा जल बाबांना अत्यंत गोड लागते व अशा भक्तांचे बाबा दास होतात. परंतु ज्ञानेश्वर महाराज त्याच्याही पुढे जाऊन सांगतात की, परमेश्वराला पान, फुल, फळ अगर जलही अर्पण करण्याची आवश्यकता नाही. मनुष्याच्या आयुष्यातील जे काही रिकामे क्षण आहेत तेवढे जर मनुष्याने नामाने भरून भगवंताला अर्पण केले तरी सुद्धा तो नामधारकाचा दास होऊन रहातो. श्रीसमर्थ रामदासस्वामींनी सुद्धा हेच सांगितले आहे.

**कांहीच करोनि प्राणी । रामनाम वदे वाणी ॥**
**तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तां लागीं सांभाळी ॥**

याप्रमाणे ते साई ! ते बाबा ! ! मला चारी दिशातून, देहाच्या कणाकणातून, रोमारोमातून स्फूर्ति देत आहेत आणि मी वेडा होत आहे साईनामाचा ! आणि 'घरकुल' माझे शिर्डी बनत आहे. त्यात आनंद, सुख, उल्हास भरला आहे. चैतन्य सुखावलय आणि साई साई — "नसे दुजा साई विना " जर मनुष्याने परमेश्वरावर भरंवसा ठेवून आपली कामे सचोटीने केली तर श्रीमंती थाटाची बासुंदी पुरी मिळाली नाही तरी खात्रीने सुखाची मीठभाकरी मिळतेच मिळते !

माझ्यावर किती संकटे कोसळली, आपत्ति आल्या. उग्र स्वरुपे आली. पण मी शांत उभा होतो साईनामात! अनंत भक्तांचे कोड पुरविणारे हे साई-कामधेनु!

कळीकाळाचा राक्षस तर भक्ताला निरागस–ते साई उभे असता हा दास डग-मगेल तरी का? असाच हिमालयाप्रमाणे स्वाभिमानाने मी साईनामात उभा आहे; जीवंत आहे!! माझ्या या देवाने आपल्या या भक्ताची लज्जा रक्षण करण्यासाठी काट्याकुट्यांचा मार्ग दूर करून माझ्या हातात गुलाबपुष्प आणून दिले आणि ते भक्तिरसाने न्हाऊन निघाले; त्यावेळी मला किती आनंद झाला —

**प्रीतिच्या अश्रुंचा वाहे हा पाट।**
**नामाने निर्मिली तीहि वाट॥**

म्हणून ज्या ठिकाणी नाम, त्या ठिकाणी राम व ज्या ठिकाणी राम ते वैकुंठधाम. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. त्याप्रमाणे परमेश्वररुपी बाबा हे नाम-धारकाच्या पाठी धावत असतात. म्हणूनच हा दास त्यांच्या नामात दंगला.

★

# श्रीसाईच्या धाव्याने तारले.

**सौ. श्री. पांडुरंग शहाणे**
लक्ष्मी निवास, गडकरी पथ, डोंबिवली पूर्व
जि. ठाणे

* माझ्या मुलीचे लग्न ५ फेब्रुवारी १९७६ रोजी वसंतपंचमीला झाले. त्यानंतर एक दिड महिन्यातील गोष्ट. तिच्या ब्रेस्टमध्ये एक सुमारे लहान सुपारी एवढी गाठ आहे असे कळून आले. तोपर्यंत मी आई असून देखील ही गोष्ट ती संकोचाने माझ्याजवळ बोलली नव्हती! ती पहिल्यांदाच माहेरी आल्यावर कोणी पुरुष मंडळी घरी नसताना तिने आपले मनोगत माझ्याजवळ उघडे केले. साईनारायणा ऽऽऽ, माझ्यावर घोर संकट आले आहे की काय अशी क्षणभर मला शंका आली. लगेच श्रीबाबांचे स्मरण करून डॉक्टरला दाखविण्याचे ठरविले. दोन दिवसात डॉक्टरला दाखवून चार दिवसात ऑपरेशन करण्याचे ठरविले. पण ही गाठ कर्करोगाची वगैरे नाही ना अशी पहाणी करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे ठरवलेल्या दिवशी डॉक्टरकडे हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी मी, मुलगी, सून व मुलगा असे डोंबिवली स्टेशनवर आलो. आल्या आल्याच गाड्या लेट असल्याचे कळले. म्हणून आम्ही तिघीच कशाबशा

एका गाडीत चढलो. मुलगा चढू शकला नाही. गाडी सुटली. ही गाडी सायनपर्यंत ठीक गेली. सायनच्या पुढे अर्ध्या अंतरावर गाडी जाताच आरडा ओरडा चालू झाला. आग — आग — आग ऽ ऽ कोणीतरी साखळी ओढली. पटापट सर्व गाडी खाली झाली. आम्ही तिघींनी देखील गाडीतून उड्या मारल्या. आधीच काळजीत असलेल्या आम्ही या प्रकाराने भांबावून गेलो व तसेच पुढे चालत राहिलो. इतर काही लोक पुन्हा गाडीत बसले. पण आम्हाला इतक्या उंचावर गाडीत चढणे शक्य नव्हते. शिवाय अद्याप गाडी चालू झाली नव्हती. माटुंगा स्टेशन तसे टप्प्यात होते. पण अंतरही होतेच. अशा वेळी पुण्याला जाणारी डेक्कन एक्सप्रेस व फास्ट लोकलही जात होत्या. अशात आमची थांबलेली गाडी चालू झाली व विरुद्ध दिशेने एक फास्ट लोकल येत होती. ते रुळ ओलांडून स्टेशनकडे जाण्यासाठी माझी धडपड चालू असतानाच गाडी आली. न् कशी कोण जाणे मी रुळाच्या अलीकडे राहिले होते. मला किंचित् जरी गाडीचा धक्का लागला असता तरी हे लिहिले गेले नसते. मनात साईंचा सारखा धावा चालला होता. माझ्या सुनेने इतक्यात अनामिक शक्तिने ओढावे तसे मला मागे ओढले. गाडी निघून गेली. पण आता आम्ही तिघी एकाच ट्रॅकवर असताना आम्ही सोडून दिलेली डोंबिवलीची गाडी येत होती. त्या गाडीचा मोटरमन लोकांच्या "पळा पळा" आरोळ्या ऐकून गाडीचा होर्न वाजवत गाडी चालवत होता. पण पुन्हा सुनेने झटूच मला ढकलुन व नणंदेला ओढून पलिकडे ढकलले. व ती स्वतः कशीतरी रेल्वे लाईन क्रॉस करती झाली. ही शक्ति कोणाची होती ? गाडी निघून गेली. पाच मिनिटे आम्ही एकमेकाकडे बघत राहिलो. आपण तिघी जिवंत आहोत ह्यावरच आमचा विश्वास बसायला वेळ लागला. केवळ बाबांचे स्मरण केले होते मी, नि बाबा धावले. पुढे हॉस्पिटलमध्ये गेलो. ऑपरेशन झाले. गाठ तपासली गेली. ती साधीच होती. ह्या सऱ्याला साईस्मरण हे एकच औषध–धावा–त्याचा धावा केला. साईबाबा धावला नि आम्हाला पावला. केवढ्या मोठ्या संकटातून बाबांनी आम्हाला तारले त्यांच्यावरील आमचा विश्वास असाच राहो व तो साईदेव आम्हाला असाच पावो हीच त्याच्या चरणी प्रार्थना. ★

# श्रीअवधूतस्वामीमहाराज यांच्या सहवासात

## [ ३ मे १९७८ रोजी होणाऱ्या स्वामींच्या जयंति उत्सवानिमित्त ]

(भगवान श्रीअवधूतस्वामीमहाराज यांचे शिष्य श्री. सुभाष पाटील)
एम. ए.

तेरा चौदा वर्षांपूर्वीची गोष्ट. कोळी कुटुंबात माझा जन्म झालेला. धर्माचे व भक्तीचे काहीच संस्कार नव्हते. त्यात तामसी मांसाहाराचे सेवन चालू होते. तेणे-करूनच मन विकारांना बळी पडलेले. पण काय आश्चर्य! भगवद्‌गीता व समर्थ श्रीरामदासस्वामी व श्रीज्ञानेश्वरमहाज यांचे काही ग्रंथ वाचनात आले. मला विकारी जीवनाचा उबग आला व देव शोधण्यासाठी वनात निघून गेलो. घरी पत्र लिहून ठेवले की, "ईश्वराच्या शोधासाठी जात आहे. तुम्हाही ईश्वर भक्ती करा." त्याकाळी भगवान श्रीअवधूतस्वामीमहाराज यांचे बंधू श्री लक्ष्मणराव लिमये व आमचे वडिलांची चांगली ओळख होती. मुलगा देवशोधार्थ घरातून निघून गेला आहे असे लक्ष्मणरावांना समजताच त्यांनी वडिलांना धीर देऊन सांगितले की, "माझे ज्येष्ठ बंधू श्रीअवधूतस्वामी महाराज मोठे सत्पुरुष आहेत. ते तुम्हाला यातून नक्की मार्ग दाखवतील, त्यांना भेटा." लक्ष्मणरावांच्या सल्ल्याप्रमाणे वडील श्रीमहाराजांना भेटले परिस्थितीचे निवेदन केले. श्रीमहाराजांनी आश्वासनपूर्वक ठामपणे वडिलांस सांगितले, "मुलगा देवशोधार्थ वनात गेला आहे. त्याला तिथे देव भेटणार नाही. तो निश्चितपणे उद्याच परत येईल पहा. तो आल्याबरोबर आमच्याकडे घेऊन या." श्रीमहाराजांचे शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य, मी त्यांनी सांगितल्याप्रमाणे घरी आलो व वडिलांनी श्रीमहाराजांची भेट करवून दिली. श्रीमहाराजांनी मला पहिल्याच भेटीत सांगितले की, "परमेश्वर हृदयात राहतो. मग त्याला शोधण्यासाठी कुठे हिंडायला हवे? आमच्या इकडे प्रवचनाचे कार्य चालू आहे. त्यात तू सहभागी हो. तुझे नक्की कल्याण होईल." त्यानंतर मी श्रीमहाराजांकडे नियमितपणे जाऊ लागलो व त्यांच्या दिव्यवाणीने व प्रेमाने प्रभावित होऊन त्यांचा शिष्य झालो व त्यांच्या पहिल्या भेटीत जे ज्ञान सांगितले त्याचाच विस्तार त्यांच्या प्रवचनातून आतापर्यंत मी ऐकला आहे व "देव बोलिले एका। दुजे नाही" याचा अनुभव घेतला आहे.

विकारी मन ताब्यात येणे कठीण होते. वारंवार मनाची प्रक्षुब्धता होत होती. शिक्षणात लक्ष लागेना. वेळी अवेळी महाराजांकडे जात असे. प्रत्येकवेळी त्यांनी मला प्रेमानेच जवळ घेतले. श्रीमहाराजांची प्रेमाची व कृपेची पाखर माझ्यावर असल्यामुळेच माझी भक्तिमार्गात जशी

प्रगती होत होती तसे शिक्षणही चालू राहिले व पुढे मी संस्कृत मराठीचा "एम. ए." झालो. माझ्यातील काव्यगुण पाहून माझ्याकडून त्यांनी ध्रुवप्रल्हादादिकांची आख्याने लिहवून घेतली व कृपेचा प्रसाद करून शेवटी आपले चरित्र महाकाव्य माझ्याकडून लिहवून घेतले. ते "श्रीअवधूतचरित्र" या नावाने १९७२ साली प्रसिद्धही झाले. शेवटी माझ्या विवाहाचा उल्लेख करणे आवश्यकच आहे. कोळीसमाजात शाकाहारी कुटुंब सापडणे कठीण. त्यातही भक्तिमार्गाला अनुकूल असे कुटुंब विरळच. माझी विवंचना श्रीमहाराजांनी ओळखली व सांगितले, "तसा योग जुळून येईल." त्याप्रमाणे वारकरी संप्रदायातील श्री. बाळकृष्णपंत वरळीकर ह्यांची कन्या सुरेखा हिच्याशी आईवडिलांच्या संमतीने व महाराजांच्या अनुमतीदर्शक आशीर्वादाने माझा विवाह नक्की झाला. पण पुढे काही विपरीत घटना घडल्या व वरळीकर व आमचे कुटुंब यात गैरसमज निर्माण होऊन वाङ्निश्चय होऊन ठरलेला विवाह मोडण्यापर्यंत पाळी आली होती. तेव्हा श्रीमहाराजानी सांगितले की, "ईश्वरेच्छेने जे घडायचे ते घडेलच." महाराजांचे आशीर्वाद फुकट कसे जाणार ! गैरसमज निवळले. आमच्या विवाहाला महाराजांनी यावे अशी माझी फार इच्छा. पण तसे घडण्यासारखे नव्हते. म्हणून विवाहाच्या दिवशी सकाळी आपल्या दत्तपीठात कन्येसह माझ्या भावीश्वशुराना बोलावून अत्यंत पवित्र वातावरणात आध्यात्मिक पद्धतीने आमचा विवाह घडवून आणला व चांदीची सुंदर दत्तमूर्ती भेट दिली. लौकिक दृष्ट्या संध्याकाळी ठरलेला विवाह पार पडला. विवाहानंतर माझी पत्नीही त्यांची शिष्या होऊन माझा भक्तिमार्ग अधिक सुलभ झाला.

महाराजांच्या सहवासात आल्यापासून त्यांचे जे कार्य मी अवलोकन केले ते भव्य व दिव्य असेच आहे. श्रीक्षेत्र धुळे येथे पट्टशिष्य श्री. त्रिंबक गानू ऊर्फ श्री सच्चिदानंद स्वामी यांच्याकडून एक लाखाचे श्रीविठ्ठलमंदिर बांधून घेऊन त्यांना तिथे लोकोद्धाराचे कार्य लावून देणे, रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र कोतवडे येथे श्रीदत्त-मंदिराची उभारणी, विरार जवळ श्रीक्षेत्र कोफराड येथे श्रीदत्तपादुका मंदिराची स्थापना, तसेच विलेपार्ले येथे श्रीअवधूत दत्तपीठाची स्थापना करून तेथील भक्त शिष्यांना कार्य लावून देणे ह्या सर्व गोष्टी मी प्रत्यक्ष डोळ्यानी पाहिल्या आहेत. श्रीमहाराजांनी आपले दोन्ही चिरंजीव श्री. अविनाश लिमये उर्फ श्रीपरमानंदस्वामी व श्री. विजय लिमये ऊर्फ श्रीकृष्णानंद स्वामी यांनाही आपला संप्रदाय देऊन आपल्या दत्तपीठात ग्रंथनिरूपणाचे कार्य लावून दिले आहे. श्रीमहाराजांची पत्नी, स्नुषा, चारही बंधू, भावजयी, जावई, कन्या व व्याही या सर्वांनी भक्तिमार्गाचा स्वीकार केला असून असे सर्वच कुटुंब भक्तिमार्गात असल्याचा आदर्श जगापुढे ठेवला आहे. श्रीमहाराजांनी आध्यात्मिक तीन ग्रंथ, तीन आध्यात्मिक नाटके व भजनावली अशी सुबोध ग्रंथरचना केली आहे. त्यांच्या शिष्य भक्त मंडळीमध्ये समाजाच्या सर्व

थरातील स्त्रीपुरुष भक्तमंडळी आहेत. प्रेम हा त्यांचा स्थायिभाव आहे व ह्या दिव्य प्रेमानेच त्यांच्याकडे आलेल्या कोणत्याही प्रकृतिगुणाच्या मनुष्याला ते आपल्याकडे ओढून घेतात व त्याला एकरूप करून घेतात. पतिपत्नी अशा दोघानाही भक्ति-मार्गाला लावणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. त्यांच्याकडे प्रत्येक शंकेला उत्तर व प्रत्येक अडचणीला उपाय आहे. आजारपणातही त्यांचे कार्य कधी अडून राहात नाही. नुकताच त्यांना फार मोठा आजार झाला होता. डॉक्टरांचा सल्ला असा होता की, त्यांनी कोणाही भक्त मंडळीला भेटू देऊ नये व प्रवचन संभाषण करू नये. परंतु श्रीमहाराजांचे जीवनच अध्यात्ममय आहे. प्रवचनाची वेळ झाल्याबरोबर ते आपले आजारपण विसरून जात व भक्तमंडळीपुढे प्रेमाचा वर्षाव करीत. श्रीमहा-राजांचा सार्थ उल्लेख करावयाचा झाला तर '**प्रेममूर्ती**' असाच करावा लागेल. परमेश्वर म्हणजेच प्रेम व प्रेम म्हणजेच परमेश्वर हा अनुभव त्यांच्या सहवासात घेतला आहे. ३ मे १९७८ रोजी श्रीमहाराजांचा ७३ वा जयंतिउत्सव आम्ही भक्तशिष्यमंडळी साजरा करीत आहोत. श्रीमहाराजांच्या चरणी सहस्त्रशः प्रणाम.

## श्रीसाईबाबा षष्ठ्यब्दी महानिर्वाण महोत्सवानिमित्य श्रीसाईलीलाचे तेरा खास अंक

| | | |
|---|---|---|
| १) ऑक्टोबर १९७८ | — | विजयादशमी विशेषांक |
| २) नोव्हेंबर–डिसेंबर १९७८ | — | दिपावली विशेषांक–स्वानुभव विशेषांक |
| ३) जानेवारी १९७९ | — | श्रीसाई समकालीन संत विशेषांक |
| ४) फेब्रुवारी १९७९ | — | श्रीसाई काव्यबहार विशेषांक |
| ५) मार्च १९७९ | — | उदी महात्म्य विशेषांक |
| ६) एप्रिल १९७९ | — | श्रीरामनवमी उत्सव अंक |
| ७) मे १९७९ | — | श्रीसाई दरबार विशेषांक |
| ८) जून १९७९ | — | श्रीसाई अगम्य लीला विशेषांक |
| ९) जुलै १९७९ | — | श्रीगुरुपौर्णिमा विशेषांक |
| १०) ऑगस्ट १९७९ | — | श्रीसाईकालीन हयात व्यक्ति विशेषांक |
| ११) सप्टेंबर १९७९ | — | प्रांतोप्रांतीचे साईबाबा विशेषांक |
| १२) ऑक्टोबर १९७९ | — | विजयादशमी विशेषांक |
| १३) नोव्हेंबर–डिसेंबर १९७९ | — | स्वानुभव विशेषांक |

"जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस ।
मागे जें जें त्यांस तें तें लाभे ॥"

–श्री. चंद्रकांत दामोदर सामंत,
ताडदेव, मुंबई ७

● महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील शिरडी ह्या एका छोट्याशा गावात सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी श्रीसाईबाबांसारखी एक महान विभूती अवतरली. आज त्यांच्या निर्याणाला जवळ-जवळ साठ वर्षे झाली असूनसुद्धा त्यांच्या कीर्तीचा व कार्यांचा गवगवा उत्तरोत्तर वाढतच आहे. श्रीबाबांच्या दिव्य कृपेचा लाभ घेतलेले असंख्य भक्तगण केवळ आपल्या भारतातच नव्हे तर जगाच्या निरनिराळ्या भागात अद्यापही आहेत.

१९७६ च्या मे महिन्यात कुर्ल्याचे सुप्रसिद्ध श्रीसाईभक्त व शिरडी संस्थानचे माजी अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर हे महिनाभर अमेरिकेला तेथील लोकांच्या निमंत्रणावरून श्रीबाबांच्या कार्याविषयी प्रवचने द्यावयास गेले होते. त्यावेळच्या त्यांच्या वास्तव्यात नव्यानेच ओळख झालेल्या श्री. मिल्टन अलेक्झांडर ह्या एका अमेरिकन गृहस्थाचे डॉ. गव्हाणकरांना नुकतेच एक पत्र आले आहे. दि. २९ जानेवारी रोजी लिहिलेल्या ह्या पत्रात श्री. अलेक्झांडर ह्यांनी त्यांना श्रीसाईनाथांनी दिलेल्या एका उत्कट अनुभवाचे वर्णन केले आहे. सदरहू पत्र इंग्रजीत असून "श्रीसाईलीला"च्या वाचकासांठी त्याचा मराठी अनुवाद खाली देत आहे.

...... "गेल्या रविवारी श्री-ऑर्थर ऑस्बोर्न ह्यांनी लिहीलेले The Incredible Saibaba हे पुस्तक मी परत एकदा वाचले. प्रत्येक वाचनाच्या वेळी मला स्वतःला ह्या पुस्तकाद्वारे अनेक गोष्टींचा उलगडा होतोसे वाटते. हे पुस्तक परत वाचावयास घेण्याआधी एक घटना घडली होती. माझ्या वरिष्ठांनी १६ जानेवारीला माझी दुसऱ्या एका विभागात बदली केली होती. मला ही गोष्ट मुळीच मान्य नव्हती. त्या दिवशी सकाळी कामावर निघण्यापूर्वी मी श्रीबाबांच्या तसबीरीपुढे हात जोडून प्रार्थना केली, "माझ्यावर तुमची जर खरोखरच मेहेरनजर असेल तर आजच्या दिवसात मला अस्तित्वाची जाणीव करून द्या." कर्मधर्म संयोगाने त्याच दिवशी माझ्या हाताखाली काम करणारा कर्मचारी नुकताच भारतातून परतला होता. अमेरिकेला परतण्यापूर्वी सपत्नीक शिरडीची वारी करूनच तो आला होता. आमच्या कचेरीत आल्याबरोबर तो तडक माझ्या टेबलापाशी आला व त्याने श्रीसाईबाबांची प्रतिमा असलेली एक अंगठी मला भेट म्हणून दिली. हीच गोष्ट

मी त्या दिवशी सकाळीं प्रार्थनेच्या समयी श्रीबाबांकडे मागितली होती. माझ्या नवीन विभागातल्या नोकरीच्या पहिल्याच दिवशी घडलेला हा शुभशकुन माझ्या दृष्टीने फार महत्वाचा होता. ईश्वरीलीला अगाध आहे ह्यात संशय नाही. ''......

## साप आणि उदी

### विलक्षण थरारक अनुभव



●नाशिकला श्री. मुळे नावाचे एक प्रसिद्ध न्यायमूर्ती आहेत. मुळे-साहेब श्रीसाईभक्त आहेतच पण त्यांच्या सौभाग्यवती बाबांच्या परमभक्त आहेत. अनेक व्रते त्यांनी केली आहेत. दिवसचे दिवस, महिनेच्या महिने अक्षरशः निराहार राहिल्यामुळेच की काय एक प्रकारचे तेजोवलय त्यांच्या संपूर्ण शरीरासभोवती आहे. त्यांच्या चेहऱ्यावर तर एक प्रकारचे विलक्षण तेज दिसते.

एकदा काय झाले या सौ. मुळेबाईंच्या घरी भर दिवसा एका सापाने प्रवेश केला. घरात पुरुष मनुष्य तर कुणी नाही, साहेब न्यायालयात निघून गेलेले. मुले आपापल्या उद्योगाला गेलेली. अशा परिस्थितीत मुळेबाईंनी न डगमगता श्रीसाईंचा धावा केला. त्यासरशी साप एका कोपऱ्यात येऊन लपून बसला. बाईंनी पटदिशी उदीची डबी आणली व चांगली चिमूटभर उदी काढून बाबांना हाक मारून मोठ्या धीराने म्हटले, बघ साप राजा, ही बाबांची उदी आहे. या उदीची मर्यादा रेषा घालून देते आहे. ही रेषा ओलांडून तू अजिबात पुढे येता कामा नयेस.''

आणि खरोखरीच काय आश्चर्य पहा ! साप अजिबात ती उदीची मर्यादा रेषा ओलांडून गेलाच नाही. पुढे मांत्रिकाला बोलावून त्या सापाला घराबाहेर काढावे लागले.

— सदानंद

# वैद्यराज बाबासाई धावूनि मजकडे येई

—कु. रक्षा वागळे, डी १०, मॉडेल हाऊस,
प्रॉक्टर रोड, गिरगाव मुं. ४.

● श्रीबाबांचे विविध चमत्कार पाहिले, ऐकले की मन अगदी भरून येते. शिरडीला येताच पंढरीला आल्यासारखे वाटते. श्रीबाबांचे दर्शन होताच जीवनाचे सार्थक होते. जन्मोजन्मी विश्वव्यापी बाबांची सेवा व्हावी हीच इच्छा मनी प्रज्वलीत होते.

बाबा हे भक्तांना मदत करतात. त्यांच्या इच्छा पूर्ण करतात. ते औषधोपचार करीत असत. एवढेच काय तर ते अजुनही करतात अन् करतीलच.

मी म्हणजे नोकरी करून शिकणारी (बी ए. ला) एक मुलगी त्यातून माझी प्रकृति काही विशेष ठीक नाही. सर्दी खोकला, कफ हा सतत होणारा. त्या त्रासाने मला अगदी हैराण केले. डॉक्टर औषध सर्व चालू पण कफ मात्र त्यावर कमी होऊन जाई. पुन्हा सुरू काय करावे हे समजत नसे. विश्रांती घेणेही शक्य नाही. दिवस जात होते. कफ खोकला चालूच होता. होत होता. जात होता. सकाळी कॉलेजला जाताना विशेष त्रास होत असे. पर्वा न करता कॉलेजात आमची स्वारी जाई. १९७८ साल उजाडले. आम्ही नेहमीप्रमाणे शिरडीला आलो. (दरवर्षी जातोच) मुंबई सोडताना मला खोकला खूपच होता बेत रद्द करावा का ? हाच विचार माझ्या आई वडिलाना पडला. पण छे छे, बाबांची इच्छा ! आम्ही शिरडीस आलो. गुरुवारी रात्री पालखी पाहिली. खोकला होताच. उलट तो जोरात येत होता. सकाळी श्रीबाबांचे मंगल स्नान चालू झाले. मन प्रसन्न बनले. बाबांनीच मला दृष्टांतात सांगितले स्नाना-तले पाणी पी. ते थंडगार पाणी, दहीदूध मधुपर्काने, गुलाबपाणी मिश्रीत पाणी मी घेतले. चांगले भांडेभर घेतले. थंडगार अहो, अक्षरशः थंडगार पाणी. खोकला असताना दही इ. मिश्रीत अन् सकाळच्या थंडगार हवेत घेतले अन् काय आश्चर्य ! बाबांचे औषधच ना ! गुण काय विचारता ! खोकला गेला नि सर्दीही गेली. ती अजून माझ्याकडे परत आली नाही. प्रकृति ठीक झाली. सकाळी कॉलेजात जाताना होणारा त्रास तेथेच तिष्ठत राहिला. याला बाबांची कृपा म्हणायचे.

पुढे माझ्या वडिलाना खोकला झाला. ते कोणाचे ऐकेनात. डॉक्टरकडे जाई-नात. औषधपाणी घेईनात. काय करावे हे कोणाला समजेचना. परीक्षा जवळ येत होती तर अभ्यासाला मन लागेना. नाहीतर परीक्षा नसली तरी संस्कृताचा अभ्यास ह्या ना त्या रूपात चालत असे. पण आता तर सर्वच वेगळे वाटत होते. खोकला जोरात होता. वडिलांचा हट्टही जोरात होता. अभ्यासावरून लक्ष उडत चालले होते.

आई काळजी करीत होती. दिवस जात होते तोच बाबांची प्रेरणा झाली. अन् मी श्रीबाबांचे चरित्र वाचण्यास सुरूवात केली. सप्ताह सुरू केला मन शांत झाले. दिवस जात होते. वडिलांना उतार पडत होता. सप्ताह संपूर्ण झाला. वडिल डॉक्टरांकडे गेले. बाबांनीच प्रेरणा दिली अन् काय आश्चर्य, ! सर्व रिपोर्ट चांगले! खोकला इत्यादी काहीच नाही.

बाबा एक उत्तम वैद्य आहेत. वैद्य औषधाने रोगी बरा करतो तर बाबा आपल्या लीलेने भक्तांचे संकट, रोग, व्याधी नष्ट करतात. बाबांचा गुण औषधाचा गुण. बाबा वैद्यराजच आहेत. ऋग्वेदातील आश्विनी कुमारच.

## श्री. रा. बा. आजगावकर साईचरणी विलीन

एक थोर साईभक्त व जुन्या पिढीतील चतुरस्र लेखक श्री. रा. बा. आजगावकर हे दिनांक २८-३-७८ रोजी श्रीसाई चरणी विलीन झाले.

ते १९१८ साली श्रीबाबांच्या निर्वाणापूर्वी बाबांना प्रत्यक्ष भेटले होते व बाबांनी त्यांना प्रेमाने जवळ बसवून घेतले होते. १९७० साली त्यांना भर दिवसा दुपारी श्रीसाईबाबांचा दृष्टांत होऊन त्यांनी एका पुस्तकाची त्यांचेकडे मागणी केली. या प्रेरणेतून त्यांनी 'श्रीसाईगीतायन' या, त्यांचे पुत्र श्री. चकोर आजगावकर लिखित गीतकाव्याच्या लेखनाला कवीला प्रोत्साहन दिले व काव्य लिहवून घेतले. श्री. साटम महाराजांचीहि श्री. रा. बा. आजगावकर यांचेवर कृपा होती. एक दोन संकटाच्या प्रसंगी दापोलीच्या सत्पुरुषाने श्रीमंत बापूसाहेबांनी तैनातीस दिलेल्या मोटारीतून त्यांना सुखरुप सोडले होते.

त्यांचा जन्म १८९८ चा होता. अन्तकालापर्यंत ते चालते बोलते होते व साईकृपेने त्यांच्या चर्येवर वेदनेची छटाहि नव्हती. त्यांनी १९२० च्या सुमारास 'मनोरंजन', 'महाराष्ट्र साहित्य' इत्यादी त्या काळच्या मान्यवर नियतकालिकातून विविध लेखन केले. 'विश्वराज' या नावाने ते काव्य लेखन करीत.

त्यांच्या मागे त्यांचे पुत्र, स्नुषा, पत्नी, नातवंडे इत्यादी परिवार असून शासकीय मुद्रणालयाचे अधिकारी श्री. शशांक व अर्थखात्यातील अधिकारी श्री. चकोर आजगावकर हे त्यांचे दोन सुपुत्र होत. त्यांची स्नुषा मुंबई महापालिकेत वैद्यकीय अधिकारी असून हे सारे कुटुंब साईभक्त आहे.

# वाऱ्यावरचे विचार

–श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, मु. पो. ठाणे

## ३६–काळा–गोरा

तो एक प्रसिद्ध कलाकार होता. चित्रकार होता. मोठमोठ्या प्रदर्शनातून त्याच्या चित्रांना बक्षिसे लागत. हौशी श्रीमंत त्याची चित्रे चांगली किंमत देऊन विकत घेत. एकदा एक श्रीमंत तरुणी त्याच्या स्टुडिओत आली. ती सुंदर होती. गोरी पान होती, प्रदर्शनात बक्षिस मिळाले म्हणून तिला सुंदर वाटणारे ते चित्र विकत घेण्यासाठी ती आली होती. चित्रकार एका चित्रात रंग भरण्यात दंग होता. भरभर फिरणाऱ्या त्याच्या कुशल कुंचल्याकडे ती कौतुकाने पहात होती. पहिला रंग भरून झाला. त्याने चित्रावर नजर टाकली व जवळ असलेल्या निरनिराळ्या रंगांवर नजर टाकली. कुंचला घेऊन तो काळा रंग देऊ लागला. तो काळा रंग पाहून ती तरुणी नकळत उद्‌गारली ईऽऽशींऽऽ चित्रकाराने तिच्याकडे पाहिलं व म्हटलं 'एवढी किळस कसली आली. माझा स्टुडिओ तर स्वच्छ व नीटनेटका आहे.' 'अहो तो काळा रंग कसला देता.' 'असं होय. तुम्हाला काळयाची किळस आहे तर. त्याचं असं आहे. आम्ही नुसता रंग बघत नाही तर रंग संगती बघतो.' दोघेही बरोबर म्हणायला हवं. व्यवहारात कुणालाही काळं आवडत नाही ज्याला त्याला गोरं शुभ्र पांढरं आवडते. कला रंग संगतीला महत्व देते. तसं म्हटलं तर कित्येक वेळा आपण व्यवहारात रंगसंगतीही साधतो. गोऱ्या गोऱ्या तरुणीला काळा काळा नवरा असलेला आपण पहातोच. यात रंगसंगती तिने साधलेली असते. त्या काळया काळयाकडे असलेल्या काळया पैशाच्या रंगाशी तिने संगती केलेली असते. काळयाच्या संगतीने तिने रंगसंगती साधलेली असते. काळयाबरोबर गोरी चालली तर त्यामुळे तिचे गोरेपण अधिक उठावदार दिसत नाही काय? अहो काळया शिवाय पांढऱ्याला शोभा नाही. भरपूर काळया कुळकुळीत केसावर पांढरी टोपी जेवढी शोभून दिसते तेवढी ती पांढऱ्या केसावर दिसत नाही. गोऱ्या चेहऱ्याला काळेकल्ले कसा उठाव देतात बरे. आपले पूर्वज पांढऱ्या कागदावर काळया शाईने लिहित म्हणून त्यांचे अक्षर मोत्यासारखे असे. व्यवहारात रंगसंगती साधावी लागते. वाईट गोष्ट पण चांगल्याच्या संगतीने तिचा दिसणारा वाईटपणा नाहीसा होतो. वाल्यासारखा लुटारु नारदाच्या संगतीने पुढे जगत्‌वंद्य ठरलाच की नाही! व्यवहारात, संसारात चांगलं वाईट असणारच. पण कोणतं किती घेऊन कोणाच्या संगतीत कसं व कुठं ठेवायचे हे जाणणारी कलाकाराची दृष्टी असली तर संसार सुखाचे होतात. वाईट दिसलं

म्हणून काय झालं ? त्याचा योग्य ठिकाणी योग्य उपयोग करून आपली जीवन नौका योग्य प्रगती पथावर चालू ठेवणे म्हणजे रंगसंगती साधणे होय.

## ३७ – कुत्र्याची छत्री

पावसात भिजू नये म्हणून माणसाने छत्री निर्माण केली. त्याला आपल्या छत्रीचा भारी अभिमान. पण उगाच डौल मारण्यात काही दम नाही. कुत्र्याचीही छत्री असते. बिचारा उन्हापावसातून गावभर भटकत असतो म्हणून निसर्गाने त्याच्यासाठी छत्री निर्माण केली आहे. तिला कु. छ. म्हणतात. माणसाच्या छत्र्यांचे कारखाने भूमीवर असतात तर कुत्र्याच्या छत्रीचे कारखाने भूमीगत असतात. हा माल पावसाळ्यात बाहेर येतो कारण हा सिझन छत्र्यांना चांगला असतो. कुत्र्याची छत्री अल्पजीवी असते तर माणसाची छत्री दीर्घ जरी नव्हे तरी काही काल टिकणारी असते. आता काही छत्र्यांच्या काड्या एक महिन्याच्या आत सुट्या होऊन दांडा तेवढा हातात राहतो हे निराळे. पण अशा छत्र्या एकंदरीत थोड्याच. कुत्र्याची छत्री नाजूक असते. हात लावला तर दांडा मोडतो नाही तर कापड फाटते. फॅशन ही कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे आहे. ती अल्पजीवी आहे. दिर्घकाल टिकत नाही. टिकली तर मग ती फॅशन म्हणून राहत नाही. फॅशन कु. छ. प्रमाणे एकाएकी उपटते. कोणीतरी एक नाविन्य म्हणून काहीतरी करतो. ( जास्त करून सिनेमावाले हा गल्लाभरू उद्योग करतात. ) त्या गोष्टीचे कोणीतरी अनुकरण करतो. त्याचे पाहून दुसरा मग तिसरा अशा प्रकारे अनुकरणाने फॅशन समाजात जिकडे तिकडे पसरते. जास्त करून पैसेवाल्यांच्या घरात तिला अधिक थारा मिळतो. कारण पैशाला फॅशन शिवाय चैन पडत नाही व दुसरा काही करता येत नाही. फॅशन का, कशासाठी हे कोणालाच माहीत नसते. फॅशनवाले तसा डोक्याला त्रास देत नाही. कारण डोकच नसतं. फॅशन का ? याला उत्तर नाही. किंबहुना ज्या विचित्रपणाला उत्तर नाही त्यालाच फॅशन म्हणतात. फॅशन मुळे फायदा होतो व्यापाऱ्यांचा. तोटा होतो राष्ट्राचा. आपला पैसा दुसऱ्याच्या घरात जातो. फॅशनमुळे आर्थिक व्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होतो. म्हणून फॅशन न करणे ही एक राष्ट्रसेवा आहे. कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे फॅशनही अल्पजीवी व अर्थहीन असते. पण ती अनर्थकारी असली तर तिला जरूर अटकाव करावा. नाहीतर कु. छ. उगवतात व आपोआप मोडून पडतात हे ओळखून उगाच फस फस करून वडीलधाऱ्या माणसांनी संघर्ष निर्माण न करण्यात शहाणपणा नव्हे काय ? कु. छ. मध्ये कुछभी दम नाही. अध्यात्मातही अशा फॅशन्स येतात. धार्मिक उत्सवात अनेकांच्या अंगात भक्तीच्या अशा छत्र्या उगवतात. माया कशी नाचवते त्याचे ते प्रात्यक्षिक आहे असं समजून देवाच्या खऱ्या छत्रीकडे ( भक्तिकडे) आपलं लक्ष सदैव ठेवावे. पावसाळ्यात कु. छ. खुप उगवल्या म्हणून खऱ्या छत्र्यांचे कारखाने बसतील काय ?

## ३८–संगम

तो एक संगम होता. ज्या ठिकाणी दोन नद्या एकत्र मिळतात त्या ठिकाणास संगम म्हणतात. एक अफाट नदी–नदी कसली नदच म्हणाना (सिंधू नदीला नद म्हणतात.) एका बाजूने वाहत येत होता. अफाट विस्तार, खोल पाणी हृदय दगडाचे यामुळे दांडगाई आरडा ओरडा करीत कोणाचे नुकसान होईल की नाही याची पर्वा न करता धटिंगणासारखा पुढे पुढे घुसणारा तो नद मनात आलं तर आजुबाजूच्या प्रदेशाचे कल्याण करी पण काही कारणाने रागावला तर सगळं उध्वस्त करी. दुसऱ्या बाजूने एक नदी येत होती. ती पण मोठी होती. तिच्या हृदयात मऊ वाळू बरीच असल्यामुळे ती शांतपणे व जरूर तेवढ्या वेगाने वाहात होती. काठावरील वैभव वाढवत होती. रागाने सहसा उफाळायची नाही. कधी क्वचित पावसाने पाण लोटात पड पड पडून डिवचली तर क्षणैक फुगेल तेवढीच, दोघेही आपआपल्यापरी वाट चालत असता एके ठिकाणी त्यांची गाठ पडली. पुढे दोघांचा मार्ग एकच असल्या-मुळे त्यांनी संगत करून पुढे जायचं ठरविले. त्या ठिकाणी नद व नदी यांनी एकमेकांचे पाणी ग्रहण केले. त्यामुळे त्यांचे मूळचे पाणी काही आता त्यांच्या अंगात राहीले नाही. दोघांचे मिळून तिसरेच पाणी तयार झाले. या पाण्यात दोघांचेही गुणधर्म होते. पुढे नाव मिळाले ते मात्र धटिंगणाचे, नदी बिचारी त्या मानाने गरीब, शांत. गरिबाला विचारतो कोण ? एखाद्या वेळी कोणी त्या नदीला विचारले की तू कोणाची कोण ? तर ती धटिंगणाचे नाव सांगी. मूळनदीच्या पाण्याचे गुणदोष आता धटिंगणाच्या नावावर खपू लागले. एखादवेळी नदी चिडून फोफावत आली तर धटिंगण फुगे व लोक त्याला बोल लावीत. संगमानंतर बिचाऱ्या नदीचे नावा पुरते अस्तित्व राहिले. असा हा प्रेमाचा संगम संसारात झाला तर मग विभक्तपणाला जागा राहिली कुठे ? भक्ताची भक्ति आपल्या हळुवार पावलाने वाटचाल करीत असता तिची कुठे तरी परमात्म्याशी गाठ पडून ती त्यात मिसळून जाते. हा संगम म्हणजे चौथी भक्ति—अभेद भक्ति. ★

# राष्ट्रपती श्री. निलम संजीव रेड्डी यांची शिरडीस भेट

## जयतु जयतु राष्ट्रपतीः



राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी समाधी मंदिरात, शेजारी राज्यपाल श्री. सादिक अली व बेगम सादिक अली दिसत आहेत.

भारताचे राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी यांनी सोमवार दि. १७ एप्रिल १९७८ रोजी शिरडीला भेट दिली. भारतीय वायुदलाच्या हेलीकॉप्टरने राष्ट्रपती व अन्य माननीय व्यक्तींचे सकाळी ११ वा. आगमन झाले. त्यांचे हेलीकॉप्टर उतरवण्यासाठी अस्तगाव येथे हेलीपॅडवर दोन खास मार्ग तयार करण्यात आले होते. अस्तगाव ते साईसमाधी मंदिरापर्यंतच्या ५ कि. मीटर्सच्या मार्गावर सुशोभित कमानी उभारल्या होत्या. वाटेत दुतर्फा उभ्या असलेल्या अनेकांनी राष्ट्रपतींना मानवंदना दिली. रामनवमी उत्सवाच्या निमित्याने जमलेल्या सहस्रावधी श्रीसाई भक्तांनी संस्थानच्या प्रांगणात राष्ट्रपतींचे जोरदार स्वागत केले. संस्थानचे प्रशासक श्री. का. सी. पाठकसाहेब व प्रांत अधिकारी श्री. काझीसाहेब यांनी पुष्पहार घालून राष्ट्रपतींचे स्वागत केले. आंध्रचे मुख्यमंत्री म्हणून व खासदार म्हणून श्री. संजीव रेड्डी १५ वर्षापूर्वी शिरडीस आले होते. राष्ट्रपतींनी श्रीबाबांच्या समाधीची स्वहस्ते षोडषोपचारे

पूजा केली. संस्थानने चांदीची श्रीसाईबाबांची मूर्ती, शाल व श्रीफळ राष्ट्रपतींना भेटीदाखल दिले.

सर्व अरिष्टे दूर होवोत व लोकशाही सुफल होऊन भारताची उत्तरोत्तर प्रगती होवो अशी प्रार्थना राष्ट्रपतींनी श्रीसाईचरणांपाशी केली. तसेच जनतेची सेवा करण्यासाठी अधिक शक्ति व निर्धार साईबाबांकडून आपणास प्राप्त होवो असे राष्ट्रपतींनी अभ्यागत वहीत लिहून ठेवले आहे.

राष्ट्रपतींसमवेत महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सादिक अली, सौ. शांती सादिक अली आणि मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनीही समाधीचे दर्शन घेतले.

संस्थानचे चोख कार्य व व्यवस्था पाहून सर्वांनीच समाधान व्यक्त केले.

# श्रीसाईलीला लेखक - कवींचे

## अतीव उत्साहात साजरे झालेले चौथे स्नेहसंमेलन

श्रीसाईलीलेच्या लेखक–कवींचे चौथे स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री यंदा थोड्या उशीरानेच, रविवार दि. १२ व सोमवार दि. १३ मार्च १९७८ रोजी मोठ्या थाटाने साजरे करण्यात आले. १९७५ साली अशा स्वरूपाचे पहिले, १९७६ साली दुसरे व १९७७ साली तिसरे अशी संमेलने भरविण्यात आलेली होती. यंदाचा हा सुमारे सव्वाशेंवर लेखक–कवींचा मेळावा अतीव उत्साहाने दोन तीन दिवस एकत्र आला, ओळखी, भेटी-गाठी झाल्या व हा समारंभ सोहळा अत्यंत शांतपणे व यशस्वीपणे पार पडला ही आनंदाची गोष्ट आहे.

या स्नेहसंमेलनाला श्रीसाईलीलेच्या इंग्रजी, मराठी अंकातून अधून मधून व नियमितपणे लेखन करणारी स्त्री-पुरुष मंडळी हजर होती. मुंबापुरीहून सुविख्यात साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर, श्री. चंद्रकांत सामंत, श्री. व सौ. प्रकाशभाई दोशी, श्री. व सौ. मा. ग. गोरे, राधाकृष्ण गुप्ता 'चेतन', श्री. अनिल रसाळ, श्री. विपिन खादीया, श्री. विजय हजारे, श्री. राजाराम हुमणे, श्री. मधुकर वखारे, श्री. रमाकांत पंडित, श्री. एन. जी. परुळेकर, लोणावळ्याहून डॉ. सौ. सुमती खानविलकर, पुण्याहून श्री. व सौ. प्रा. र. श्री. पुजारी, श्री. व सौ. रघुनाथ सांडभोर, श्री. श्रीराम

आठवले, श्री. जे. एन. कुलकर्णी, श्री. दत्तात्रेय महादेव मोरे, श्री. व सौ सूर्यकांत गर्जे, इंदूरहून श्री. व सौ. बापूसाहेब निरखे, बिदरहून प्रा. गुंडेराव पटवारी, मालेगावहून सौ. सुशिलाबाई हजारे, सांगलीहून सौ. मीना खाडीलकर, सोलापूरच्या कु. शशिकला साळगावकर, नागपूरहून श्री. के. रा. थालगावकर, नवापूरहून श्री. हसमुख पाटील, श्री. रमेश चव्हाण, धुळ्याहून श्री. नागेश मोगलाईकर, श्री. जगदीश देवपूरकर, शिर्डीच्याच सौ. उषाताई मुळे, लीलाताई गुजराथी इ. इ. प्रमुख साहित्य सेवकांचा अवश्य उल्लेख करावयास हवा. याशिवाय बंगलोरहून खास ऑल इंडिया साई समाजाचे अध्यक्ष माननीय श्री. राधाकृष्ण स्वामीजी प्रमुख पाहुणे म्हणून व प्रिं. रामचंद्रन इ. मान्यवर व्यक्ती हजर होत्या.

याशिवाय सर्वश्री. व सौ. चंद्रकांत पुरव, आर. डी. नायक, ग. वि. आकेरकर, बाळकृष्ण शेणवी, प्रकाश मांडवीकर, डी. डी. चव्हाण, रमाकांत कारेकर, पी. एस. अत्रे, मनोहर कोचरेकर, श्री. व सौ. आप्पा सामंत, श्री. शशिकांत पोलेकर, जी. व्ही. नायडू, जी. व्ही. चव्हाण, नयना सकपाळ, शामराव लोंबर, दौलतराम आसनानी, द्वारकानाथ अहुजा, नंदकुमार पिसाट, कु. गांधी इ. साईभक्त हितचिंतक मंडळींनी हजर राहून कार्यक्रमास विशेष शोभा आणली.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे रविवार ता. १२ मार्च रोजी सकाळी प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरवात झाली. श्रीसाई बाबांना प्रत्यक्ष अनेकदा पाहिलेले व शिर्डीसच त्याकाळी वास्तव्य करून असलेले व सध्या अहमदनगरच्या शैक्षणिक क्षेत्रात असामान्य कर्तबगारी बजावलेले सुसंस्कृत साईभक्त श्री. गणेश जयदेव चितांबर हे अध्यक्षस्थानी होते. त्यांचेच वडील बंधू श्री. अनंतराव चितांबर गतसाली संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते.

सकाळच्या पहिल्या बैठकीत सर्वांचे सुस्वागत करण्यात आले त्या प्रसंगी सौ. अलका रिसवडकर व सौ. मीना खाडीलकर यांनी स्वागतपर गीतेही म्हटली. यानंतर गतसालच्या काळात दिवंगत साईभक्तांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून आदरांजली वाहण्यात आली. नंतर साईलीला मासिकाच्या मराठी आवृत्तीचे का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी संमेलन भरविण्याचा हेतू, उद्देश स्पष्ट करून सांगितला व संमेलन यशस्वी करण्यास सर्वांना आवाहन केले. नंतर अध्यक्ष श्री. चितांबर यांचा परिचय श्री. चेंदवणकर व मुख्य पाहुणे श्री. राधाकृष्ण स्वामीजी यांचा परिचय इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी करून दिला. यानंतर दूरदरून आलेल्या मंडळींनी आपापला परिचय करून दिला व या कार्यातच दुपारचे बारा केव्हा वाजले हे समजले देखील नाही; लगेच मंडळी दुपारच्या आरतीस गेली व

प्रसाद ग्रहणानंतर विश्रांती घेऊन दुपारी चार वाजता संमेलनातील चर्चेच्या प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरवात झाली. या बैठकीत श्रीसाईलीलेचा खप जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने काय काय करता येईल याबद्दल मोकळेपणाने चर्चा झाली. या चर्चेत अनेकांनी भाग घेतला. अंकाच्या मुखपृष्ठात सुधारणा करावी, अंकाची किंमत व पाने वाढवावी, आकार मोठा करावा, जाहिराती घ्याव्यात, आणखीन दर्जेदार लेखन यावे, नवनवीन सदरे सुरू करून नवनवीन लेखक-कवींना वाव द्यावा, हिंदी, गुजराथी आवृत्ती पण असावी, मासिक मुलांसाठी पण वाचनीय असावे यासाठी एखादे मुलांसाठी सदर असावे, रेल्वे स्टॉलस्वरही अंक विक्रीला ठेवावेत. इ. सूचना मांडल्या गेल्या. हा कार्यक्रम सायंकाळी ६-३० वाजेस्तोवर चालला. का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यानी लेखकांकडून संपादकांची काय अपेक्षा असते या एका विचारलेल्या प्रश्नावर खुलासेवार उत्तरे देऊन सर्वांचे समाधान केले. लेखकांनी लेख थोडक्यात पाठवावेत. ते मुद्देसूद असावेत. कागदाच्या एकाच बाजूने ते लिहिलेले असावेत. वादग्रस्त मुद्यांवर अजिबात लेखन करू नये. पोस्ट कार्डे, आंतरदेशीय कागदावर लिहून लेख पाठवू नयेत. इ. गोष्टी त्यांनी स्पष्ट केल्या. भोजनोत्तर मंडळी समाधी मंदिरात जमली. रात्री ८ ते १० वाजेपर्यंतचा वेळ खास संमेलन प्रतिनिधींना हजेरी लावण्यासाठी देण्यात आला होता. याप्रसंगी श्री. नागेश मोगलाईकर, सौ. सरला गर्जे, श्री. दत्तात्रय मोरे, श्री. विजय हजारे, श्री. आप्पा सामंत, सौ. कमल व सुनील सांडभोर, हसमुख पाटील, कु. जयश्री पुजारी, श्री. राम आठवले, श्री. रघुनाथ सांडभोर इ. नी हजेऱ्या लावल्या.

सोमवार दिनांक १३ मार्च रोजी सकाळी ९-३० वाजता एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम झाला व तो म्हणजे कवींच्या काव्यगीत वाचनाचा आतापर्यंत अशा स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला नव्हता. या बहारदार कार्यक्रमात डॉ. सौ. सुमती खानविलकर, नागेश मोगलाईकर, श्री. मोरे, रमेश चव्हाण, मधुकर वखारे, शाम लोंढे, 'चेतन', हसमुख पाटील, ग. दि. कुलकर्णी, श्रीराम आठवले, श्री. व सौ. सांडभोर, रमाकांत पंडित, जगदीश देवपुरकर, विजय हजारे, गुंडेराव पटवारी, शशिकला साळगावकर, लीलावती गुजराथी, सरला गर्जे, इ. कवि, कवयित्रींनी भाग घेऊन हा कार्यक्रम खूपच रंगवला. 'दर्शन मला देरे' हे सुमती खानविलकर यांचे गीत, 'सातजन्मी जे पुण्य लाभले आज फळास आले. मला हे चरण कमल दिसले' हे नागेश मोगलाईकर यांचे गीत, "पत्थर पे बैठकर जो हुकूमत कर रहा है" हे प्रा. गुंडेराव पटवारी यांचे गीत यांनी तर कार्यक्रमाला खूपच रंगत आणली. १२ वाजेपर्यंत हा कार्यक्रम कसाबसा आटोपता घ्यावा लागला. आरती व भोजनोतर मंडळी दुपारी ३-३० वा. शांतीनिवासातील सभागृहात जमली. यावेळी संमेलनाचा समारोपाचा भाग आयोजित करण्यात आला होता. यावेळी संमेलन

प्रतिनिधी संस्थान पदाधिकारी यांचा परिचय करून देण्यात आला. श्री. पाटील, श्री. चाकलीवार, श्री. बाबासाहेब शिंदे, श्री. रणभोर, श्री. जागवे, श्री. नागपुरे, डॉ. केळकर इ. नी आपापला परिचय करून दिला. यानंतर साईबाबा संस्थानातर्फे संमेलनाचे अध्यक्ष सौ. व श्री. गणेश जयदेव चितांबर, संमेलनाचे प्रमुख पाहुणे श्रीराधाकृष्ण-स्वामी अध्यक्ष ऑल इंडिया साईसमाज बंगलोर, मद्रास, श्री. अनंत जयदेव चितांबर माजी संमेलनाध्यक्ष, डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर, सौ. सुनिता त्र्यंबक चावक (निबंध स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांक पारितोषिकाच्या मानकरी) इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक डॉ. दादासाहेब परचुरे, मराठी आवृत्तीचे का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर, प्रा. र. श्री. पुजारी, (साईनाथ चरित्र लिहिल्याबद्दल) श्री. निवृत्ती पाटील गोंदकर (साईना पाहिलेले भक्त) यांचा कोर्टरिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांचे हस्ते शाल, पुष्पहार व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारा-पूर्वी डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, श्री. अनंतराव चितांबर, यांची भाषणे झाली. श्री. पाटील यांनी संस्थानचा एका दृष्टीक्षेपात परिचय करून दिला. श्रीराधाकृष्ण-स्वामींचे सर्वांना शुभाशिर्वादपर इंग्रजी भाषण झाले. त्यांच्या आंग्ल भाषणांचा मराठी अनुवाद डॉ. परचुरे यांनी थोडक्यात कथन केला. स्वामींनी सर्वांना साई-साई मुखे म्हणा, असा उपदेश करून १० मे १९७८ रोजी बंगलोर येथे बसविण्यात येणाऱ्या श्रीसाईबाबांच्या पुतळ्याच्या समारंभाचे आमंत्रण दिले.

श्री. गणेशपंत चितांबर यांनी केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात, संत प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या सहवासात केवळ त्यांचा वागण्यानेच सदाचरणाने आपल्या मनावर इष्टतो परिणाम होत असतो. कोणत्याही शब्दाने होत नाही इतका सुपरिणाम आचरणाचा मानवी मनावर होत असतो. म्हणूनच संतसमागमाला भारतीय संस्कृतीत अनादी कालापासून अनन्य साधारण स्थान आहे. संस्कृती ही कृतींनी सिद्ध होते असं माझं मत आहे. माणसाची कृती, आचरण त्याच्या प्रकृतीवर म्हणजे स्वभावावर अवलंबून असते; व त्याची प्रकृती (स्वभाव) ही त्याची मनोधारणा किंवा विचार यावर अवलंबून असते. कोणत्याही माणसाचा मानसिक विकास हा साधुसंतांच्या सान्निध्यात सुद्धा स्वरूपात होत असतो. त्यांच्या सहवासात त्यांचे आचरण पाहून व त्यांचे शब्द ऐकून त्यांच्या संदेशानुसार आपल्या मनावर सुपरिणामच होतात. ही संतमंडळी देवाचे साक्षात् अवतार, मानवरूप धारण करून पृथ्वीवर अवतरलेली असतात. श्रीसाईबाबा हे त्यापैकीच एक होत. श्रीसाईंच्या सहवासात असा सुपरिणाम मी स्वतः अनुभवलेला आहे व तो फळालाही आला आहे. माझ्या बालपणापासून साईभक्तांचा मेळावाच माझे भोवती होता, त्यातच मी वावरत असे तशात माझे जन्म दाते मातापिता हे निष्ठावंत साईभक्त होते. मी शिर्डीतच जन्मल्यामुळे मी तर साई बाबांचे जवळ बसून गप्पा मारून, खेळून, त्यांच्या हातचा प्रसाद खाऊन लहानपण

घालविले यामुळे माझी जी मानसिक जडण घडण झाली तिचाच परिणाम हा माझ्या जीवनातील यशाला कारणीभूत झाला असं मी मानीत आलो आहे त्यामुळे कोणतीही गोष्ट करताना मी बाबांचे स्मरण करतो, दर्शन घेतो, उदी लावतो त्यामुळे मनात स्थैर्य निर्माण होतं, आत्मविश्वास निर्माण होतो व या जोरावर सत् कार्यात यश मिळतंच असा माझा अनुभव आहे. साईबाबांच्या समकालीन अशा अनेक स्वर्गतांना मी पाहिलेलं आहे हे मी भाग्य समजतो. स्वतः अनासक्त राहून स्वतःचा आत्मा शुद्ध ठेवून निष्काम परोपकार करून आपल्याकडे येणाऱ्यांचे दुःख हरण करण्याची आत्मिक-अध्यात्मिक ताकद व संत सामर्थ्य श्रीबाबांच्यामधे होतं ते अद्यापही त्यांच्या मूर्तीत म्हणा प्रतिमेत म्हणा, पादुकात म्हणा, समाधीत म्हणा असे म्हणून हा जनसमुदाय हा लोकांचा प्रचंड ओघ त्यांच्या दर्शनासाठी शिरडीस अद्याप येत आहे संत पुरुषांच्या वाणीने दुःख सुसह्य होते किंवा नाहीसही होतं तसा विश्वास पाहिजे तशी भक्ति पाहिजे. तशी श्रद्धा पाहिजे असे परखड सुविचार व्यक्त केले. त्यांच्या भाषणानंतर डॉ. परचुरे यांनी अध्यक्षमहोदयांचा, श्री व सौ. का. सी. पाठक रिसीव्हर साहेबांचा पुष्पहार घेऊन सत्कार केला व सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रतिनिधींचेतर्फे सौ. सुशिलाबाई हजारे यांनी दिलखुलासपणे आभार प्रदर्शन केले, त्यांनी शेवटी संमेलन यशस्वी करण्यासाठी भरपूर श्रम घेतलेल्या कुमार सुभाष चंदवणकर यास धन्यवाद देऊन त्याचाही सत्कार केला. दोन दिवसांचा हा सत्कार सोहळा सोमवारी दिनांक १३ रोजी सायंकाळी संपला. 卐

# शिरडी-वृत्त माहे फेब्रुवारी सन १९७८

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन** :- संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

**प्रवचन** :- १) ह. भ. प. जगन्नाथबुवा बावचौरे, शिरडी.
२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा बावचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन** :- १) श्रीमती विमल भा. शिंदे, मुंबई, २) श्री. संभाजी तु. घुमाळ, मुंबई. ३) श्री. माणिकबुवा शेवाळे, उस्मानाबाद. ४) श्री.

ज्ञानोबा माहुली, राहाता. ५) सौ. सुलोचना द. कुलकर्णी, कोपरगाव. ६) श्री. दिना-नाथ रा. नाईक, कोपरगाव. ७) श्री. दीपक गीत कलापथक, नायगाव मुंबई. ८) श्री. रघुनाथराव नागरे, शिर्डी. ९) श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टी, मुंबई. १०) सौ. पुष्पा पागधरे, मुंबई. ११) श्री. बाळासाहेब साठे, मुंबई. १२) श्री. मिरजकर, मुंबई. १३) श्री. अजय वडावकर, मुंबई. १४) श्री. दिपक तीरकर, मुंबई. १५) श्री. वसंत धुमाळ, मुंबई. १६) श्री. मोहनराव, मुंबई. १७) श्री. पांचाळ, मुंबई. १८) श्री. एम. ए. बॉबी, मुंबई. १९) श्री. मन्वा, जबलपूर. २०) श्री. रशीद, मालेगाव. २१) सौ. विमल म. गुरो, मुंबई. २२) कु. चित्रा व संत, पुणे. २३) श्री. जी. बी. भागवत, पुणे.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन, महाराष्ट्र राज्य परिवहन महा-मंडळ, मुंबई.
२) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.
३) प. पू. मुक्तानंदजी महाराज, गणेशपुरी.
४) मा. श्री. ॐप्रकाश गणोत्रा, IAS चिफ एक्झिक्युटीव्ह ऑफिसर अ. नगर
५) मा. श्री. राजाध्यक्ष IAS निर्वाचन आयुक्त दिल्ली.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडी-वृत्त माहे मार्च सन १९७८

या महिन्यात शिरडीस श्रींचे दर्शनाकरिता बाहेरगावची साईभक्त मंडळी बहु-संख्येने आली होती. शुक्रवार दि. २४–३–७८ ते रविवार दि. २६–३–७८ पर्यंत जोडून सुट्या होत्या त्यामुळे शिरडीत यात्रेचे स्वरूप आले होते.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन** :– १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली.
२) श्रीमती रुक्मिणीबाई म. भोसले, सोलापूर यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन** :– ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाबचौरे, शिरडी यांचे प्रवचन झाले.

**गायन, वादन, भजन** :– १) श्री. एच. गोपालराव, रायपूर.
२) श्री. नंदू ज. बोरसे, मालेगाव.

३) श्री. विपुल अ. कुलेंकर, गोरेगाव मुंबई. ४) श्री. चंद्रकांत इंगळे, मुंबई. ५) श्री. अनंत शा. कुलेंकर, मुंबई. ६) सौ. आशा द. इंगळे, मुंबई. ७) सौ. शकुंतला अ. कुलेंकर, मुंबई. ८) कु. अलका अ. कुलेंकर, मुंबई. ९) सौ. अलका भा. रिसवडकर, अंधेरी, मुंबई. १०) श्री. सुधीर कुलेंकर, मुंबई. ११) कु. जयश्री पुजारी, पुणे. १२) श्री. नागेशराव मोगलाईकर, धुळे. १३) सौ. कमल सांडभोर, पुणे. १४) कु. सुनिल सांडभोर, पुणे. १५) सौ. सुमती खानविलकर, लोणावळा. १६) श्री विजय हजारे, बोरीवली. १७) श्री. हसमुख पाटील, नवापूर. १८) सौ. सुशिलाबाई हजारे, मालेगाव. १९) श्री. रमेश चव्हाण, नवापूर. २०) श्री. दत्तात्रय मोरे, पुणे. २१) कु. मंदाबाई आडगावकर, मालेगाव. २२) कु. स्मिता गद्रे, पुणे. २३) श्री. जगदीश छो. देवपुरकर, धुळे. २४) सौ. सरलाबाई गद्रे, पुणे. २५) सौ. मीनाक्षी खाडीलकर, सांगली. २६) कु. शशिकला साळगांवकर, सोलापूर. २७) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. २८) श्री. जगन्नाथ कुलकर्णी, पुणे. २९) श्री. श्रीराम आठवले, पुणे. ३०) श्री. गुंडेराव पटवारी, बिदर. ३१) श्री. आप्पा सामंत, दादर, मुंबई. २) श्री. शाम ना. लोंबर, पुणे. ३३) श्री. एस. एम. कुहाड, धंतोली, नागपूर. ३४) कु. अजय म. हेडाऊ नागपूर ३५) श्री. गोविंद शं. गोगवेकर मुंबई. ३६) श्री. महादेव वि. खवणेकर, मुंबई ३७) श्री. विठोबा ता. लभडे. मडनिमगांव ३८) श्री. सत्यसाई सेवा समिती मुंबई ३९) सौ. नमिता सेन गुप्ता. लखनौ. ४०) श्रीसत्यसाई सेवा समिती मुंबई ५७. ४१) श्रीमती पुष्पलता अं. शिंत्रे, गिरगाव मुंबई ४२) श्री. मोरोपंत पुरंदरे मुंबई ४३) श्री. मधुकर वऱ्हाडकर मुंबई. ४४) श्री. सी. एस. संगम, मुंबई. ४५) सौ. वत्सला अ. नाडकर्णी मुंबई. ४६) कु. रुक्मीनी म. भोसले. सोलापूर ४७) कु. विमल भा. शिर्के जळगाव ४८) श्री. बाळासाहेब माळवदकर पुणे.

**रंगपंचमी** :–सालाबादप्रमाणे श्रींच्या रथाची मिरवणूक सायंकाळी रंगपंचमीचे दिवशी गावातून ५ ते ६–४५ पर्यंत निघाली होती.

**माननीयांच्या भेटी** :—

१) मा. श्री. भालेराव. निवडणूक कमिशनर महाराष्ट्र.
२) मा. श्री. उमरावसिंग. शिक्षण मंत्री भोपाळ.
३) मा. श्री. भूपेंद्रसिंग ब्रिगेडर NCC. महाराष्ट्र.
४) मा. श्री. एस. व्ही. सुंदरम् IAS. मॅनेजिंग डायरेक्टर मॅफको मुंबई.
५) मा. श्री. जितकर. जिल्हाधिकारी अहमदनगर.

६) मा. श्री. वसाक जिल्हाधिकारी नासिक.
७) मा. श्री. शिवाजीराव पाटील RDC अहमदनगर.
**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

❖❖❖❖❖❖❖❖

# परमहंस श्रीमुक्तानंद स्वामीजींची शिरडीभेट

श्री. स्वामी परमहंस मुक्तानंद महाराज गणेशपुरी यांचे शुभहस्ते संस्थान मधील झालेले महत्वाचे कार्यक्रम :—

शनिवार दि. १८–२–७८ रोजी रात्री ९–३० वा. स्वामीजींचे शिरडीस आगमन झाले. मा. श्री. एन. के. पारेख न्यायमूर्ती सिटी सीव्हील कोर्ट मुंबई व मा. श्री. का. सी. पाठक रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. स्वामीजींनी श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले. त्यांचे सोबत सुमारे एक हजार स्वामीजींचे शिष्य होते त्यामधे अंदाजे सहा-सातशे अमेरिकन स्त्री पुरुष होते. दि. १९-२-७८ रोजी रविवारी पहाटे काकड आरती ते रात्री शेजारती पर्यंत अमेरिकन पाहुणे श्रीसाईबाबांचे मंदिरातील सर्व कार्यक्रमास उपस्थीत होते. गणेशपुरी आश्रमातील भक्तांकडून सकाळी ६–३० ते ७–३० पर्यंत गुरुगीता वाचन कार्यक्रम झाला. अमेरिकन लोकांनी संस्कृत मधून स्पष्ट उच्चाराने गायीलेली गीता ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. सकाळी ९ ते ९–३० पर्यंत लेंडी बागेतील श्रीदत्तमंदिरासमोर साकोरी आश्रमातील वेद-शास्त्र संपन्न कन्यांकडून वेदघोष कार्यक्रम झाला. त्याचवेळी श्रीस्वामी परमहंस मुक्तानंदजी महाराज यांचे शुभहस्ते दत्तमंदिरावर कळस बसविणेत आला. लेंडीबागेत दिपगृहाचे उद्‌घाटन झाल्यावर सकाळी ९–४५ ते १०–२५ पर्यंत स्वामीजींच्या शुभहस्ते नवीन भोजन गृहाचा कोनशीला समारंभ झाला. सकाळी १०–३० ते ११–१५ पर्यंत श्रीसाईनाथ हॉस्पीटलच्या स्पेशल रुमचे उद्‌घाटन. नवीन इमारतीचे उद्‌घाटन, स्टाफ क्वार्टरच्या नविन समर्पण बिल्डींगचे उद्‌घाटन इ. कार्यक्रम झाले. त्यानंतर शिरडी गाईड, कॅलेंडर वगैरे नवीन पुस्तकांचे स्वामीजींच्या शुभहस्ते प्रकाशन झाल्यावर स्वामीजींचा सत्कार करण्यात आला मा. श्री. गोडखिंडी व्यवस्थापक अधिकारी यांनी संस्थानची माहिती सांगितली. श्री. पारेख साहेब व श्री. पाठक साहेब यांनी आभार प्रदर्शन केले. स्वामीजींच्या शुभहस्ते चांगले काम केलेल्या लोकांना बक्षिसे देण्यात आली. स्वामीजींचे उपदेशपर भाषण झाल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

# हेच द्यावे दान

मुखी घेता साईनाम
हरपले मन विसरलो भान ।
विसरलो भान संपला अभिमान
संपला अभिमान वृथा वाटे धन।
वृथा वाटे धन काय करू सन्मान
काय करू सन्मान द्यावे एक दान।
फक्त द्यावे एक दान
" की व्हावे अखंड साईचिंतन ॥

# हे साईनाथा।

हे साईनाथा,
मी तुमच्या चरणी ठेविला माथा
कृपा करावी मज अनाथा ।
हे साईनाथा,
दूर करी सर्व व्यथा
तुझ्या महिमेच्या वर्णाव्या किती कथा ।
हे साईनाथा,
मी मस्तकी लावितो तुमचीच गाथा
विसरूनी माझी देह अवस्था ।
हे साईनाथा
आले शिर्डी गांव विसरूनी सर्व प्रथा
तुझ्याच चरणाचा मी दास अनाथा ।

श्री. अशोक केळकर
१२३४ सुभाषनगर, पुणे २

# श्रीसाईलीला

वासुदेवा वंदुनिया दृष्टीसाई लावना,
सुक्ष्म साक्षी दत्तजीवी सोच साई रामना. ॥ धृ ॥
भोग भोक्ता तोच देही खूणजीवी बाणना.
कामनातीं सज्जनाची पाहतीना सत्यना.
आठवीतः धाव घेतो तोच साई जाणना ॥ १ ॥
दासपाही नीर वाहे प्रत्ययासी ज्ञानना
तेलनाहीं देस दाता वास पाणी ज्योतना
उत्सवासी मोदभरे देव पाही भक्तिना ॥ २ ॥
देव येतो धावुनीया भक्ति पोटी प्रेमना
अन्नदानी पुण्य मोठे धर्म मार्गी वागना
सूक्ष्मतेची ब्रह्मआना सांगतीना तावना

—वि. वा. कौलगेकर
दाळ आळी, तळ्याशेजारी, मु. पो. तळेगाव, दाभाडे.

# आनंदीआनंद

१) आनंदी आनंद गडे
साईनाथ आहे चोहीकडे
इकडे साई तिकडे साई
मनी साई ध्यानी साई
आनंदी आनंद गडे.

२) शिरडीस आहे साई
अमृत आहे त्याचे पाई
तेथेच जन हे आपुले सर्वस्व वाही
भेदभाव नाही त्याचे घरी
आनंदी आनंद गडे

लेखकः– नरेन्द्र विश्वनाथ चित्रे
बुरबोन कॉलनी, जिनसी रोड,
भोपाळ (म. प्र.)

# तुझी उदी

तुझ्या उदीमधे
अमोल विश्वास
उतारा साऱ्यास
तुझी उदी

उदीची मजला
कळली महती
तिचे वर्णू किती
गुणगान !

तुझ्या उदीमधे
अर्थ जिवनाचा
अर्थ मरणाचा
दडलेला.

ग. दे. कुळकर्णी
'कुलदीप' तांबरी
उस्मानाबाद

# याचना

साई तुझे नांव मानवा आधार
संकटी अडलो सांभाळ संसार ॥ धृ ॥
संकटाच्या ऊन्ही तळमळे काया
तुझी दया घना असो कृपाछाया
बुडत्या नावेला साईचा आधार ॥ १ ॥
सोडूनी सर्वस्वी आलो तुझ्या दारी
साई बाबा आता तूचि मला तारी
याचना करीतो तुझा हा पामर ॥ २ ॥

–एम्. के. गुम्मलवार
कार्याध्यक्ष, मराठवाडा, साहित्यिक मित्रमंडळ,
विणकर कॉलनी चौफाळ, नांदेड

# .... आरति साईबाबांची ....

( चाल :— सुखकर्ता दुःखहर्ता )

अमोल श्रद्धा असुची ठेवूनी तव चरणी ।
साईनाथा तुझी करीतो मन धरणी ॥

निंबवृक्षातळी शिर्डी प्रगटला ।
जणू वैराग्याचा स्वामी अवतरला ॥ १ ॥

जयदेव जयदेव जयसाईनाथा ॥
तुझे चरणी आता ठेवियला माथा ॥ धृ ॥

डोईस फेटा अंगी कफनी साजिरी ।
शिळेवरी बैसुनी भक्ता उद्धरी ॥

धूनि पेटवुनी पापे जाळीशी ।
उदी देऊनी रोगा पळविशी ॥ २ ॥ जयदेव जयदेव ॥

सर्व धर्मियांचा मेळा भरविला ।
पाणी ओतूनी पणत्या पेटविल्या ॥

साईनाथा तुझे रूप गोजिरे ।
जणू रामकृष्ण शिर्डी अवतरले ॥ ३ ॥ जयदेव जयदेव ।

— श्री. मनोहर घ. पितळे
पितळे वाडी, विलेपार्ले ( पूर्व ) मुं. नं. ५७.

# 'माझे दैवत'

साई सारखे दैवत असता शिरडी क्षेत्री।
कशाला जाऊ मी दूर तीर्थ क्षेत्री ॥ ध्रु ॥

मुखी घेता साईनाम
हरपते माझे देहभान
दिसे सामोरी श्रीराम ॥ १ ॥

कशाला जाऊ मी दूर तीर्थ क्षेत्री

विठ्ठल पाहाता दिसे साई
दोहि मध्ये दुजा भाव नाही
शिरडी झाले पंढरपूर रखुमाई ॥ २ ॥

कशाला जाऊ मी दूर तीर्थ क्षेत्री

दत्त दत्त ऐसे करीता ध्यान
साईरूप झाले अवतीर्ण
साईकृपेची ऐसी नवलाई ॥ ३ ॥

कशाला जाऊ मी दूर तीर्थ क्षेत्री.

—सौ. वैशाली आनंद हिंदळेकर
ओ/२०९, इंडियन ऑईल नगर, जयप्रकाश रोड,
अंधेरी पश्चिम, मुं. ४०००५८.

# ' आदरांजली '

दयाघना प्रभु श्रीसाईंबाबा
तुमची कृपादृष्टी हाची आमुचा ठेवा
अन्य मागणे नाही तुजे देवा
असाच कृपाप्रसाद आम्हा द्यावा ॥ १ ॥

अनन्यशरण तुम्हासी आम्ही आलो
प्रेमात न्हाऊनी कृतकृत्य जाहलो
तव प्रेमाची शिदोरी घेऊन मी चाललो
मनःशांतीसाठी पुन्हा पुन्हा येथे आलो. ॥ २ ॥

शिर्डी क्षेत्र हीच आमुची स्वर्गनगरी
पावन झाली भक्तमंडळी या पुण्यग्रामी
बाबांना वगळीता शून्यची उरते जगी
नम्र आदरांजली अर्पितो बाबा तुम्हा पदी ॥ ३ ॥

— मधुकर वखारे, वडाळा.

# श्रीसाई गीत

साई राम सुमर राम तेरे काम आयेंगा
तेरे काम आयेंगा ॥ धृ० ॥

भाई बंधू राज पाठ महले माडीया
तेरे महले माडीया
अंत काल मेल कोही साथ जायेंगा
तेरे साथ जायेंगा ॥ १ ॥

मनूजाका शरीर भाग्यसे
हमें मिला
जब बित गया काल फिर
क्या बतावूंगा
तेरे क्या बतावूंगा ॥ २ ॥

दुनियोके कारभार में तू
भूल या फिरे
में तू भूल या फिरे
चिडीयोंके बाज जैसे तुझे काल आयेंगा
तुझे काल आयेंगा ॥ ३ ॥

करले जतन हजार साई नामके बिना
साई नामके बिना
कहताहे ब्रह्म नंद साई
मोक्ष पावेंगा
तुझे मोक्ष पावेंगा ॥ ४ ॥

—लीलावती कां. गुजराथी, शिर्डी.

# " साई प्रेमगीत "

( तर्ज : मैं शायर तो नहीं ......... फिल्म – बॉबी )

मैं गायक, तो नहीं
मगर ए " साई, "
जबसे पूजा, मैं ने तुझको, मुझको,
गायकी आ गई ... ...
मैं सेवक, तो नहीं,
मगर ए " साई, "
जबसे देखा, मैंने तुझको, मुझको,
सेवकाई आ गई,
मैं गायक तो नहीं .. ...
" साई " का नाम मैंने सुना था मगर
" साई " क्या है, ये मुझको नहीं थी खबर,
मैं तो भटका रहा औरों की तरह,
" साई " से दूर रहा गैरों की तरह,
मैं भटका, तो सही,
मगर ए " साई "
जबसे देखा मैंने तुझको, मुझको,
मेरी मंजिल मिल गई,
मैं गायक तो नहीं ... ...
सोचता था " साई " से बहुत माँगता,
मगर अब मैं, " साई " से क्या माँगता,
जबसे नाम " साई " का मैं लेने लगा,
तबसे जैसे " साई " के संग में रहने लगा,
मैं साथी, तो नहीं
मगर ए " साई "
जबसे देखा, मैंने तुझको, मुझको
मेरा साथी मिल गया,
मै गायक तो नही ... ...

डा. रामकृष्ण पटेल
" साईबिरादर " आगासौद, जिला सागर ( म. प्र. )

# मला हे चरण कमल दिसले !

सात जन्मी जे, पुण्य लाभले, आज फळा आले ।
मला हे चरण कमल दिसले ॥ धृ० ॥
सहजच वळली, माझी पाऊले
सहजच जुळले कर ।
सहजच झुकले, मस्तक माझे
साई चरणावर ।
कसे हे घडले, काही न कळले, दिव्य परि दिसले ॥ १ ॥
मंदिर दिसलें, दिसली समाधी
दिसले जे दिसते ।
याहून अधिक, दिसले मजला
जे ना कधी दिसते ॥
परब्रह्म, परमेश्वराचें, स्वरूप मला दिसले ॥ २ ॥
ऐकून होतो, अनुभव आला
पटली मम खात्री ।
भिन्न धर्मीचे, भिन्न प्रांतीचे
जमती का यात्री ॥
साईनाथ, देतात हात, जे संकटात फसले ॥ ३ ॥
लोहा लाभे, परिस स्पर्शिता
सुवर्णमय कांती ।
चरण स्पर्शिता, श्री साईचे
विरली मम भ्रांती ॥
चमत्कार हे, अनेक ऐसे, अनेकास दिसले ॥ ४ ॥
मंगलमय हे, दर्शन घडले
घडला साक्षात्कार ।
निराकार, निर्गुणाचे दिसले
सगुण रूप साकार ॥
जीवा-शिवाचे, अगम्य अनुपम, मिलन मला दिसले ॥ ५ ॥

— श्री. नागेश मोगलाईकर
"नागलक्ष्मी," २८२० ग. नं. ४ धुळे

# 'मी साई गुरू पाहिले'

कृतार्थ माझे जीवन झाले.
आज मी साई गुरू पाहिले ॥
अंगी कफनी वस्त्र वेष्टिले शिरी ।
सिंहासनी बैसली मूर्ति गुरूची साजिरी ।
भालि केशरी गंध शोभले ॥ १ ॥

सतेज कांति हास्य मुखावर
न मिता देती आशिश गुरूवर
अल्ला मालिक भला करेगा
शब्द मुखीं आले ॥ २ ॥

भाव फुलांची गुंफूनी माला
अर्पिली मी सद्‌गुरूला
प्रेमाश्रुचे उदक आज मी
या चरणी वाहिले ॥ ३ ॥

दो नयनांच्या ज्योति करूनी
भावभक्तिचा धुप जाळुमी
पुजन करूनी मम सद्‌गुरुचे
चरण तीर्थ मी आज प्राशिले ॥ ४ ॥

—श्री. जगन्नाथ नारायण कुलकर्णी
स्वाति सोसायटी, फ्लॉ. नं. ७
श्रीसाई सदन, पद्मावती, पुणे ९

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) स. चेंदवणकर | ०–७५ |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

आकार : दर दिवसास २५ पैसे

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

नवजीवन हौसिंग सोसायटी,

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१. संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.